पान १ वरून

# शासकीय कर्मचारी बेमुदत संपावर

प्रमुख मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम जाहीर करणे, १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन देणे, सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना (१०:२०:३०) लागू करणे, तसेच निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याची मागणी यांचा समावेश आहे. याशिवाय राज्यातील सुमारे ३५ टक्के रिक्त पदांमुळे वाढलेल्या कामाच्या ताणाकडेही कर्मचाऱ्यांनी लक्ष वेधले आहे. चतुर्थश्रेणी व वाहन चालकांच्या भरतीवरील बंदी उठवणे, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण करणे, सर्व कर्मचाऱ्यांसाठी कॅशलेस आरोग्य विमा योजना लागू करणे, तसेच जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याच्या मागण्या देखील यामध्ये आहेत. नगरपालिका व नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रश्न सोडवण्याची मागणीही करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यातील मोठ्या संख्येने कर्मचारी या संपात सहभागी झाले आहेत. अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एकत्र येत कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी केली. त्यानंतर शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. या संपामध्ये राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी समन्वय समिती, महाराष्ट्र शासकीय परिचारिका संघटना, तसेच राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनांचे पदाधिकारी व सदस्य सहभागी झाले आहेत. सुरेश पालकर, संदीप नागे, प्रभाकर नाईक, दर्शना पाटील आदींसह असंख्य कर्मचारी उपस्थित होते.

**शिक्षकांचा संपाला पाठिंबा**

रायगड जिल्ह्यातील शिक्षकदेखील या संपात सहभागी होणार होते. मात्र, सध्या परीक्षा सुरू असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष संपात सहभागी न होण्याचा निर्णय घेतला. तरीदेखील शिक्षकांनी या आंदोलनाला आपला पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले आहे.

# न्हावा शेवा बंदरात १३२ कंटेनर्स जप्त

न्हावा शेवा बंदरातून मोठ्या प्रमाणावर कंटेनर्सद्वारे विविध मालाची वाहतूक होत असताना अशा प्रकारच्या घटना समोर येत असल्याने प्रशासनासमोर आव्हान निर्माण झाले आहे. दरम्यान, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, संबंधित रॅकेटचा पूर्ण पर्दाफाश करण्यासाठी यंत्रणा कामाला लागली आहे.

# लोणेरे हत्याकांडाचे गूढ उलगडले

करत पुरावे गोळा केले. पुढील तपासात मृत तरुणीची ओळख पल्लवी मोरे (२२, रा. वडगाव बौद्धवाडी, ता. माणगाव) अशी पटली आहे.०याप्रकरणी गोरेगाव पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध हत्या, लैंगिक अत्याचार तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रायगड आणि रत्नागिरी पोलिसांची चार पथके आरोपीच्या शोधासाठी रवाना झाली असून, त्याची ओळख निश्चित झाल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. दरम्यान, तपास अधिक काटेकोर करण्यासाठी सीसीटीव्ही फुटेजचा शोध घेतला जात आहे. संबंधित लॉजमधील कॅमेरे बंद असल्याचे समोर आले असले, तरी परिसरातील इतर ठिकाणांवरील फुटेज तपासले जात आहे. तसेच रूममध्ये सापडलेल्या जेवणाच्या पार्सलच्या आधारेही पोलिसांनी तपासाची दिशा ठरवली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी महाड शंकर काळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लॉज मालक आणि कर्मचाऱ्यांच्या जबाबांवरून या गुन्ह्यात एकाच आरोपीचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले असून, आरोपीला लवकरच अटक होण्याची शक्यता आहे.

# पारदर्शकतेसाठीचा जीआर धाब्यावर

विशिष्ट दुकानदाराकडून सक्तीने साहित्य खरेदी करण्यास भाग पाडू नये, तसेच पालकांवर अतिरिक्त आर्थिक बोजा टाकू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच एनसीईआरटी आणि एससीईआरटी (बालभारती) अभ्यासक्रमानुसारच पाठ्यपुस्तकांचा वापर करणे आवश्यक असून, खासगी प्रकाशनांच्या पुस्तकांची सक्ती टाळण्याचेही आदेशात नमूद आहे. मात्र, प्रत्यक्षात पेण तालुक्यातील काही शाळांकडून पालकांना ठराविक दुकानांमधूनच साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. तसेच खासगी प्रकाशनांची महागडी पुस्तके घेण्यास सक्ती केल्याने पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शिक्षण विभागाने या आदेशांचे उल्लंघन केल्यास संबंधित शाळा व्यवस्थापनावर कडक कारवाईचा इशारा दिला असला, तरी स्थानिक पातळीवर या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे 'जीआर फक्त कागदावरच?' असा सवाल उपस्थित केला जात आहे. या पार्श्वभूमीवर गट शिक्षण अधिकारी शर्मिला शेंडे यांच्याशी संपर्क साधला असता, ''या संदर्भातील तक्रारींची चौकशी करून दोषी आढळणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले-

# टोमणा मारल्याच्या रागातून मारहाण

मुलगामध्ये पडताच, त्याच्यावरही दगडाने हल्ला करून जखमी करण्यात आले. यावेळी अन्य तिघांनीही संगनमत करून फिर्यादी व त्याच्या मुलावर दगडफेक करत मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या घरावर दगडफेक करून खिडक्यांच्या काचा फोडत नुकसान केल्याचीही माहिती समोर आली आहे. याप्रकरणी चार आरोपींविरोधात कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विविध कलमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला असून, पुढील तपास पोलीस हवालदार तोरवे करीत आहेत.

# पळसदरी धरणात तरुण बुडाला

ही बाब लक्षात येताच त्याच्या मित्रांनी तात्काळ आर्यनचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, मात्र पाण्याची खोली अधिक असल्याने त्यांना यश आले नाही. घटनेची माहिती मिळताच स्थानिक ग्रामस्थ, कर्जत पोलीस ठाण्याचे कर्मचारी आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. तसेच खोपोली येथील हेल्प फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेचे सदस्य पुढे सरसावले आहेत. सध्या धरण परिसरात युद्धपातळीवर शोधमोहीम सुरू असून, पाण्यात उतरून आर्यनचा शोध घेतला जात आहे. मात्र, अंधार पडल्याने ही मोहीम थांबवण्यात आली आहे.

# कार्लेखिंडीत दोन एसटी बसची धडक

कार्लेखिंड येथे चालकाने एका दुचाकीला ओव्हरटेक करण्याचा प्रयत्न केला. त्याच वेळी पनवेलहून अलिबागकडे येणारी दुसरी एसटी बस समोरून येत होती. परिणामी, दोन्ही बसची जोरदार धडक झाली.

अपघातानंतर घटनास्थळी काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली. या अपघातात बसमधील एकूण ३४ प्रवासी सुखरूप असल्याची माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली आहे.दरम्यान, ओव्हरटेक करताना झालेल्या निष्काळजीपणामुळे हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर येत असून, अधिक तपास सुरू आहे.

# मुलींच्या शिक्षणाला आर्थिक बळ

मुलगी असलेल्या कुटुंबातील मुलीलाही पात्रता आहे. दुसऱ्या प्रसूतीवेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास त्या मुलींनाही लाभ दिला जातो. रायगडमध्ये या कालावधीत एकूण ७ हजार १९८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ६ हजार २८० लाभार्थ्यांना प्रत्येकी ५ हजार रुपयांचा लाभ देण्यात आला असून, एकूण ३ कोटी १४ लाख रुपये वितरित करण्यात आले आहेत. उर्वरित ९१८ लाभार्थ्यांना निधी उपलब्ध होताच लाभ देण्यात येणार आहे. जि.प.च्या महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी आणि जिल्हा कार्यक्रम अधिकारी निर्मला कुचिक यांनी अधिकाधिक पालकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

# लाचखोर उपायुक्त एसीबीच्या जाळ्यात

तक्रारीची दखल घेत एसीबीने तत्काळ पडताळणी केली. पोलीस उपाधीक्षक धर्मराज सोनके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या चौकशीत लाचेची मागणी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर सापळा रचून कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. मंगळवारी सायंकाळी तक्रारदाराकडून ४२ हजार रुपये स्वीकारताना गायकवाड यांना सीबीडी बेलापूर येथील कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले. याप्रकरणी डॉ. कैलास गायकवाड यांच्या विरोधात एनआरआय सागरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. या कारवाईमुळे नवी मुंबई महानगरपालिकेत एकच खळबळ उडाली असून, लाचखोरीविरोधात एसीबीने पुन्हा एकदा कडक संदेश दिला आहे.

# उरण नगरपरिषदेत बनावट टेंडर घोटाळा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण नगरपरिषदेत टेंडर प्रक्रियेत झालेल्या गंभीर गैरप्रकाराचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. एका अज्ञात इसमाने कंत्राटदाराच्या नावाचा गैरवापर करून तब्बल दहा वर्षे जिम चालवली आणि संबंधित कंत्राटदाराच्या नावावर १ कोटी १ लाख ६३ हजार ४९८ रुपयांची थकबाकी दाखवण्यात आल्याने एकच खळबळ उडाली आहे.

वाशी, नवी मुंबई येथील सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर वासुदेव छगन पाटील (५३) यांनी उरण पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांनी कधीही उरण नगरपरिषदेत कोणतेही कंत्राट घेतलेले नसताना त्यांच्या नावावर थकबाकीची नोटीस बजावण्यात आली. यानंतर त्यांनी केलेल्या तपासात हा संपूर्ण प्रकार उघडकीस आला.

तक्रारीनुसार, सागर विलास मोहिते (४१, रा. उरण) याने पाटील यांच्या नावाने बनावट पॅन कार्ड, आयकर विवरणपत्र, रेशन कार्ड, गुमास्ता परवाना, लेटरहेड तसेच खोट्या सह्या तयार करून उरण नगरपरिषदेच्या ''श्रीमान बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल'' येथील व्यायामशाळेचा गाळा मिळवला. संबंधित इसमाने सप्टेंबर २०१५ पासून फेब्रुवारी २०२६ पर्यंत जिम चालवून कोणतेही भाडे न भरता शासनाची व तक्रारदाराची फसवणूक केल्याचा आरोप आहे.

याप्रकरणी उरण पोलीस ठाण्यात विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक राहुल रामाजी कटावणी करीत आहेत. दरम्यान, इतक्या दीर्घ कालावधीत नगरपरिषद प्रशासनाला हा प्रकार कसा लक्षात आला नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत असून, या घोटाळ्यामागील इतर संबंधितांचीही चौकशी होण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY**

**Teaching Staff Required**

Prabhakar Patil Education Society is one of the leading Education society, working since 2001. We run various English-medium schools (affiliated with CBSE and the State Board) located at Veshvi (Alibag), Nagaon, Sambari (Kurdus), and Khalapur.

**Requirement :** Teachers for Pre-Primary, Primary and Secondary Sections.

**Subjects:** English, Mathematics, Science, Social Studies, Sanskrit, French, Art & Craft, Physical Education (P.T.), Karate, Marathi, Hindi.

**Qualification for Teachers :** Post Graduates or Graduates with M.Ed., B.Ed., D.Ed., ECCED, M.P.Ed., or B.P.Ed.

**Note:** Fluency in English is mandatory.

**Salary Scale:**

Teachers: Upto 30,000 per month,

(Salary will be commensurate with experience and qualifications.)

**For More Details Please Contact & Apply On:**

Rajashree Patil – 9892150116

Email: pnp.rajashree@gmail.com

Ankit Bhanushali – 9823897088

Email: ankitbhanushali02@gmail.com

**Interview Date :-** 27th April 2026

Timing :- 12 p.m. to 4 p.m

Venue :- PNP Education Society's Central office, Opposite Durg Suruchi Vada, Veshvi, Alibag, 402201

**PRABHAKAR PATIL EDUCATION SOCIETY'S,**
**ARTS, COMMERCE & SCIENCE JUNIOR COLLEGE.**
**VESHVI-ALIBAG-402201.**

**WALK-IN-INTERVIEW**

VENUE: Prabhakar Patil Education Society's, Head Office. Veshvi-Alibag-402201

DATE : 25th April 2026
TIME: 10:00 A.M.
Contact: 8482867876

**Junior College Marathi & English Medium**
**Permanently Unaided**

| Sr.No. | Subject | Cadre | Qualifications | Posts | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | Mar | Eng |
| 1 | Biology (Botany/Zoology) | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | | 2 |
| 2 | Physics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | | 2 |
| 3 | Mathematics | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | | 2 |
| 4 | Computer Sci. | Asst.Teacher | M.Sc./MCA/B.E./M.E. | | 2 |
| 5 | Chemistry | Asst.Teacher | M.Sc.B.Ed. | | 2 |
| 6 | Hindi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 | |
| 7 | Marathi | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 | |
| 8 | Geography | Asst.Teacher | M.A.B.Ed. | | 1 |
| 9 | English | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 2 | |
| 10 | Political Science | Asst.Teacher | M.A.B.Ed. | | 1 |
| 11 | History | Asst.Teacher | M.A.B.Ed. | 1 | 1 |
| 12 | Commerce | Asst.Teacher | M.com.B.Ed. | 1 | 1 |
| 13 | Economics | Asst.Teacher | M.A./M.com.B.Ed. | 1 | 1 |
| 14 | IT | Asst.Teacher | M.Sc./MCA/B.E./M.E. | 1 | |
| 15 | Science | Lab Assistant | B.Sc./B.Com | 1 | |

The eligible and desirous candidates should write hand written application on plain paper and submit it before or on the date of interview along with attested Xerox copies of the testimonials. The candidates are requested to prepare a demo lesson on their own subject.

*Note - Travelling Allowance will not be given.

**Sd/SECRETARY.**
**(Mrs.Chitralekha N. Patil)**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through SRM E-tender process of MSETCL in two bid system from bidders who are registered Electrical Vendors/Contractors of MSETCL for following SRM E-tender;

| RFx No. | E-Tender No. | Particulars | Estimated Cost | EMD | Tender Fees |
|---|---|---|---|---|---|
| 7000039599 | EE/400kV/RS(O&M)/DN/KHR/Ten-05/26-27 | SRM Tender for providing & fixing of PSU/Remote Indicator Suitable for WTI/OTI of ICT's and PTRs at 400kV Kharghar S/stn under 400kV RS O&M Dn., Kharghar. | Rs. 10.10 Lakhs (incl. GST) | Rs. 10108.39 | Rs. 590/- (incl. GST) |

**Sale period:** 20.04.2026 to 04.05.2026, **Last Date of Submission:** 04.05.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 05.05.2026 at 10:30 Hrs (if possible).

**Contact person:** Executive Engineer, 400kV RS O&M Dn., Kharghar. (Contact No-9167006557). For further details please visit to **https://srmetender.mahatransco.in**

**Sd/-**
**Executive Engineer,**
**400kV RS O&M Dn., Kharghar**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे लोणारे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| लोणारे ता. अलिबाग | ४७/८ | जिरायत ०-०५-५० | ०.१७ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत ही विद्यमान मालक दामोदर रामचंद्र जोशी यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक-२१/०४/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राह्मण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे मुळे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीं मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| मुळे अलिबाग | १५७ | ०-०२-५० | ०.६४ |
| मुळे अलिबाग | २६ | ०-०३-५० | ०.० |
| मुळे अलिबाग | २९ | ०-०२-०० | ०.० |

वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती ह्या विद्यमान मालक कै.दामोदर रामचंद्र जोशी तर्फे वारस मुलगे १) विनायक रामचंद्र जोशी, २) दामोदर रामचंद्र जोशी, नातु, ३) सुयोग शंकर बापट, नात ४) संजीवनी मिलिंद चांदोरकर, ५) साधना रविंद्र देशपांडे यांचे निर्वेध मालकी हक्काच्या व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक- २१/०४/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राह्मण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, मौजे शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत विद्यमान मालक श्रीम. पूजा प्रसन्न अंबुलकर, श्री. जगदीश जयवंत पाटील, सुजाता अनिल भाटकर यांचेकडून खरेदी करण्याचे आमचे आशिलांनी ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | स.नं/हि. नं | क्षेत्र (हे. आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| शिरढोण | २०/२/३ | १-२७-०० | ५-०० |

सदर मिळकतीचे खरेदीबाबत आमचे अशिलांची विद्यमान मालकांशी बोलणी सुरु असून सदर मिळकत विद्यमान मालकांकडून खरेदी करण्याचे आमचे अशिलांनी ठरविलेले आहे. सदर मिळकत निर्वेध, बोजाविरहीत असून सदर मिळकतीमध्ये कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, दान, गहाण, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस दैनिकात प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत प्रथम दर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे विहीत मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न झाल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आमचे अशिल वरील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहीत मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आम्ही कोणत्याही प्रकारे जबाबदार रहणार नाही.

येणेप्रमाणे नोटीस दिली.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०४/२०२६

**ॲड. प्राजक्ता प्र. जाधव**
रा. २०१, सी विंग, जान्हवी अपार्टमेंट,
प्रांत ऑफिसच्या मागे, जुने पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड, पिन ४१०२०६
मोबाईल नं. ९००४७७३६३३

दिनांक :- २१/०४/२०२६

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे - धोंडसे ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे- धोंडसे ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स. नं./हि. नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्रीमती स्मिता नरेंद्र कावळे | ६/१५/अ | ०-९५-०० | ०-४९ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ०७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली-सुधागड
दिनांक- २१/०४/२०२६

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड, जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील हे खालील वर्णनाच्या शेती मिळकती मिळकतींचे विद्यमान मालक श्री. नितीन नारायण निकम, रा. नेरूळ वेस्ट, नवी मुंबई ४००७०६ यांचेकडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - आसरे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| १८ | २-०८-०० मिळकत मालकांचे हिश्याचे क्षेत्र ०-४८-०० यापैकी ०-२०-०० | ०-८६ ०-१९ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २१/०४/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर
पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेल्या शेतजमिन मिळकतीचे मालक श्री. संजय सोहनलाल जैन यांनी त्यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील शेतजमिन मिळकत आमचे अशिल यांना कायम स्वरूपी खरेदीखताने विकत देण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिलांचे बरोबर केलेली आहेत. मौजे कोल्हीवली, तालुका- कर्जत, जिल्हा - रायगड ४१०२०१ येथील सामाईक शेतजमिन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे नमुद केले आहे:-

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार |
|---|---|---|
| १५/२/क | ०.०५.३० | ०.६९ |

तरी शेतजमिन मिळकतीच्या बाबतीत कोणाचाही कुळवहिवाट, ताबा, वहीवाट बयाणा पावती, साठेकरार गहाण, बोजा, बक्षीस, दान, जप्ती, लिज, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा कायदेशिर हक्क, भारतातील कोणत्याही कोर्टाचे केसेस व मनाईहुकूम, न्यायनिर्णय, आदेश, तसेच त्रयस्थ इसमांबरोबर केलेला करारनामा व इतर कोणतेही हितसंबंध असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत खाली सही करणार वकील यांच्या नमुद केलेल्या कार्यालयाचे पत्त्यावर आपल्या हरकती लेखी पुराव्यासह देण्यात यावे. दिलेल्या मुदतीनंतर कोणाचीही हरकत आली तर ती हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

कर्जत
तारीख २२/०४/२०२६

सही/-
**ॲड. जगदिश पांडूरंग कराळे**
कार्यालय : गाळा नंबर १०, पंकज रेसिडेन्सी,
साई हॉस्पीटल जवळ, आगरी समाज हॉल शेजारी,
धामोते, नेरळ, ता. कर्जत, जि. रायगड ४१०१०१,
मो.नं. ८३६९२१७३१३

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या जमिन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | २०७७ | जिरायत ०-०९-१० बागायत ०-०५-९० पो. ख. ०-००-३० एकुण ०-१५-३० | ३.५८ |
| चौल ता. अलिबाग | २०७९ | जिरायत ०.०९.१० बागायत ०-०५-९० पो. ख. ०-००-४० एकुण ०-१५-४० | ३.५८ |

वर वर्णन केलेल्या संपूर्ण जमीन मिळकती सदर नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकती या विद्यमान मालक श्री. पांडुरंग जानू राऊत यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, त्या विकण्याचा त्यांस पुर्ण कायदेशिर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा,वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक- २१/०४/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**ॲड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
लक्ष्मी नारायण, १ ला मजला,
शॉप नं. ७ व ८, ब्राम्हण आळी,
राम मंदिर समोर, ता. अलिबाग,
जि. रायगड ४०२२०१

# निवडक

## विमानतळ परिसरातील टपऱ्यांवर कारवाई

**पनवेल :** आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात वाढलेल्या अतिक्रमणांवर सिडकोने धडक कारवाई करत बेकायदा ढाबे, पान



टपऱ्या, चहा स्टॉल आणि ताडी-माडीच्या दुकानांवर बुलडोझर चालवला. आम्र मार्ग आणि विमानतळाच्या कंपाउंडदरम्यान उभारण्यात आलेली विविध कच्ची बांधकामे पूर्णपणे हटवण्यात आली. संबंधित साहित्यही जप्त करण्यात आले. या कारवाईमुळे परिसरातील अनधिकृत व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत. आम्र मार्गालगतचा परिसर अतिक्रमणासाठी हॉटस्पॉट ठरत होता. त्यामुळे वाहतूक कोंडी, अस्वच्छता आणि सुरक्षेचा प्रश्न निर्माण होत होते. या पार्श्वभूमीवर सिडकोच्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने नियोजनबद्ध मोहीम राबवत सर्व कच्ची बांधकामे निष्कासित केली. पान टपऱ्या, चहा स्टॉल, ताडी-माडीची दुकाने आणि इतर तात्पुरत्या संरचना जमीनदोस्त केल्या. विमानतळ परिसर हा उच्च सुरक्षा क्षेत्र असल्याने अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांकडे प्रशासनाने गंभीरतेने लक्ष दिले आहे. अनियंत्रित टपऱ्यांमुळे वाढणारी गर्दी आणि संभाव्य सुरक्षाधोका लक्षात घेऊन ही मोहीम राबवण्यात आली. सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मॅगडे यांच्या निर्देशानुसार ही कारवाई करण्यात आली. अतिक्रमणाविरोधातील मोहीम यापुढे आणखी तीव्र करण्यात येणार आहे. विशेषतः विमानतळ परिसर पूर्णपणे अतिक्रमणमुक्त ठेवण्यासाठी नियमित कारवाया सुरूच राहणार असल्याचे सिडकोच्या संबधित विभागाने स्पष्ट केले आहे.



## दोन वर्षीय मुलगी जखमी

**पनवेल :** शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी पट्टीवरून दुचाकी घसरल्याने झालेल्या अपघातात दोन वर्षीय मुलगी जखमी झाली. येथील लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेक दुचाकी घसरतात. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे. जैन कुटुंबीय दुचाकीवरून पनवेलच्या दिशेने येत होते. ते जेवणासाठी पनवेल येथे येत असताना नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील लोखंडी क्रॉसिंग पट्टीवरून त्यांची दुचाकी स्लिप झाली आणि ते सर्वजण खाली पडले. त्यात त्यांच्या दोन वर्षीय मुलीला गंभीर दुखापत झाली. तातडीने मुलीला जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. तीच्यावर उपचार करून तिला सोडण्यात आले. मात्र, या ठिकाणी लोखंडी पट्टी क्रॉस करताना अनेकदा अपघात झालेले आहेत. त्यामुळे या ठिकाणी उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

## कल्हे विठ्ठलवाडीतील विवाहिता बेपत्ता

**पनवेल :** तालुक्यातील कल्हे विठ्ठलवाडी येथून एक विवाहित महिला हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस



ठाण्यात करण्यात आली आहे. कविता कैलास पवार (२४) असे या महिलेचे नाव असून तिचा वर्ण गोरा, उंची ५ फुट, बांधा मध्यम, डोळे काळे, केस काळे पांढरे लांब, नाक सरळ, चेहरा गोल असून, अंगात काळ्या रंगाचा पंजाबी ड्रेस, हातात हिरवी कडा बांगडी, नाकात चमकी, गळ्यात छोटे मंगळसूत्र आहे. तिला मराठी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल तालुका पोलीस ठाणे पोलीस शिपाई प्रकाश घुले यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## दुचाकीस्वाराने गळ्यातून सोनसाखळी हिसकावली

**पनवेल :** कामोठे उपनगरात सकाळच्या शांत वातावरणातही गुन्हेगारांचा सुळसुळाट वाढत असल्याचे चित्र समोर आले आहे. सेक्टर ६ परिसरात मॉर्निंग वॉकसाठी बाहेर पडलेल्या एका ४९ वर्षीय व्यक्तीच्या गळ्यातील सुमारे अडीच लाख रुपयांची सोनसाखळी दुचाकीवरून आलेल्या चोरट्यांनी क्षणात हिसकावून नेल्याची घटना घडली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कामोठेतील सेक्टर ६ 'अ' परिसरातील एल्लोरा हाईट्स येथे राहणारे संबंधित व्यक्ती सकाळी सव्वासहा वाजण्याच्या सुमारास आपल्या पाळीव श्वानासह फेरफटका मारण्यासाठी बाहेर पडले होते. अचानक भरधाव वेगात दुचाकीवरून दोन चोरटे त्यांच्या दिशेने आले. काही कळण्याच्या आतच त्यांनी त्या व्यक्तीच्या गळ्यातील सोनसाखळी झडप घालून हिसकावली आणि क्षणार्धात घटनास्थळावरून पसार झाले. दरम्यान, सकाळी व सायंकाळच्या वेळी अशा प्रकारच्या स्त्री पुरूषांना लुटीच्या घटना घडत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. पोलिसांनी गस्त वाढवून अशा गुन्हेगारांवर आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

## माथेरानमध्ये सर्रासपणे वृक्षतोड

**माथेरान :** येथे काही वर्षांपासून जुने बंगले खरेदी करून त्याजागी आलिशान हॉटेल्स उभी रहात आहेत. या हॉटेलमध्ये रूम्स बांधताना अडसर ठरणारी झाडे मुळासहित छाटली जात आहेत. अशाचप्रकारे मेघदूत हॉटेल येथे मंगळवारी (दि.२१) दिवसाढवळ्या झाडांची कत्तल करण्यात आली. त्यामुळे वनखात्याने याकडे जाणिवपुर्वक दुर्लक्ष केले आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. एकीकडे 'झाडे लावा, झाडे वाचवा' अशा वल्गना केल्या जात आहेत आणि दुसरीकडे दिवसाढवळ्या झाडांची कत्तल केली जात आहे. पर्यावरण वाचवायचे असेल तर येथील वनसंपदा टिकली पाहिजे. सद्यस्थितीत याठिकाणी जी काही जुनी वनराई आहे तेच आकर्षण आजही कायम आहे. आजपर्यंत जे सत्तेत विराजमान झाले त्यांनी फक्त रस्ते, पाणी, वीज याच प्रश्नांची उकल करण्यासाठी प्रयत्न केले आहेत. अशाचप्रकारे जर झाडे कापली गेली तर येथील वातावरण आणि नैसर्गिक संपदा लोप पावून भविष्यात हे मोकळे रान होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# वन्यप्राण्यांचा अधिवास धोक्यात

- प्रशासनाकडून कंपाऊंड काढण्याचा दिखावा
- यामागे अर्थकारण झाल्याचा संशय

**। माथेरान । प्रतिनिधी ।**

माथेरानमधील एल्फिन्स्टन बंगला परिसरात तारेचे कुंपण घालण्यात आले आहे. त्यामुळे या परिसरातून सैर करणाऱ्या वन्यप्राण्यांच्या मुक्त संचारावर मर्यादा आल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. याबाबत नगरपरिषद व वन विभागाला वेळोवेळी लेखी निवेदन देत या प्रकरणात तातडीने हस्तक्षेपाची मागणी केली होती. याबाबतचे वृत्त 'कृषीवल'ने दि.४ मार्च रोजी प्रसिद्ध केले होते. त्यानंतर १५ दिवसांत महसूल अधीक्षकांच्या आदेशाने वन विभागाकडून येथील कुंपण हटविण्यात आले. मात्र, प्रशासनाने येथील जाळ्या काढण्याचा दिखावा केल्याचा आरोप राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी केला आहे.



माथेरान हे ठिकाण डोंगरावर वसलेले असून येथील मोठ्या प्रमाणातील भाग घनदाट जंगलाने व्यापलेला आहे. येथील वनसंपदा ही वन्य प्राण्यांचा आदिवास समजला जातो. तसेच, माथेरानमधील वन नियम आणि कायदे हे राज्याच्या अन्य भागांपेक्षा वेगळे आहेत. परंतु, मागील काही वर्षांपासून या ठिकाणी सर्व नियम आणि कायदे धाब्यावर बसवण्याची परंपराच सुरू झाली आहे. येथील वन्यप्राण्यांना जंगलात मुक्त संचार करता यावा यासाठी माथेरानमध्ये कोणत्याही प्रकारचे कुंपण घातले जाऊ नये, असे मुंबई वन कायद्यात नियम आहे. परंतु, सद्यस्थितीत येथील जुन्या बंगल्यांची विक्री होत गेल्याने काही नवीन मालकांनी बंगल्या भोवती संपूर्ण भागात जाळीचे कंपाऊंड टाकण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे जंगल भागातील प्राण्यांच्या अधिवासावर निर्बंध आले आहेत. परिणामी आगामी काळात या वन्य प्राण्यांच्या संख्येत घट होणार असून त्यांचा मुक्तसंचार लुप्त होण्याची शक्यता स्थानिकांसह प्राणी मित्रांकडून वर्तवली जात आहे.

येथील एल्फिन्स्टन बंगल्याच्या नवीन मालकाने जवळपास ३६ एकरांवर असणाऱ्या या बंगल्याच्या सभोवताली जाळीचे कंपाऊंड केले आहे. हे केलेले कंपाऊंड योग्य नसून वन्य प्राण्यांच्या मुक्तसंचारावर गदा येत आहे. या बंगल्याच्या जवळच मंकी पॉईंट आणि मॅलेट स्प्रिंग हे पाण्याचे स्त्रोत असल्याने याठिकाणी जंगली प्राणी आपली पाण्याची तहान भागवत असतात. त्यामुळे हे कंपाऊंड तातडीने काढून टाकण्यात यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष संतोष शिंदे यांनी केली आहे. याबाबत त्यांनी संबंधित विभागाकडे लेखी पत्रव्यवहार केलेला असतानाही अद्याप याबाबत कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नगरपरिषद व संबंधित प्रशासनाच्या गलथान कारभाराबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. नगरपरिषदेच्या सहायक रचनाकार करुणा बांगर यांनी मार्च महिन्यात या भागात येऊन हे कंपाऊंड काढायला हवे, असा दिखावा केला होता. वनपाल यांनीही याठिकाणची एक दिवस नाममात्र पाहणी केली होती. परंतु, काहीच योग्य कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे निश्चितच यामागे राजकीय वरदहस्ताने मोठे अर्थकारण झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. याबाबत नगरपरिषदेच्या सहायक रचनाकार करुणा बांगर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता होऊ शकला नाही.

### मुक्त संचारावर कुंपणाची गदा

एल्फिन्स्टन बंगला परिसरात घातलेल्या कंपाऊंडमुळे वन्य प्राण्यांच्या मुक्त संचारात अडथळा निर्माण झाला आहे. या बंगल्याच्या जवळच मंकी पॉईंट आणि मॅलेट स्प्रिंग हे पाण्याचे स्त्रोत असल्याने याठिकाणी वन्य प्राणी आपली पाण्याची तहान भागवत असतात. परंतु, त्यांच्या मार्गात हे तारेचे कंपाऊंड मोठा अडथळा ठरत आहे. त्यामुळे वन्य प्राणी मार्गाअभावी त्याच ठिकाणी खुपवेळ रेंगाळत राहतात. त्याचा त्रास परिसरातील स्थानिकांनाही सोसावा लागत आहे. असेच सुरू राहिले तर येथील वन्य प्राण्यांचा अधिवास धोक्यात येऊ शकतो. किंवा ते अन्यठिकाणी स्थलांतरीत होण्याची भीती प्राणी मित्रांकडून व्यक्त केली जात आहे.

> माथेरान स्थळासाठी वेगळी नियमावली असून जंगल भाग असल्याने वन्य प्राण्यांच्या अधिवासाकरिता कोणत्याही वास्तूला कंपाऊंड करता येत नाही. आम्ही लेखी निवेदने देऊनही नाममात्र चार ते पाच जाळ्या काढण्याचा दिखावा नगरपरिषदेच्या सहायक रचनाकार करुणा बांगर यांनी केलेला आहे. बाकी सर्व जाळ्या आजही तशाच आहेत. वनखात्याचे अधिकारी सुद्धा मूग गिळून गप्प बसले आहेत. त्यांनाही आपल्या कर्तव्याची जाण नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.
>
> – संतोष शिंदे, उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, माथेरान

# उरणमधील शासकीय कार्यालयात शुकशुकाट

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील सरकारी कर्मचारी, जिल्हा परिषद, तसेच शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत संपावर गेल्याने शासकीय कार्यालयात शुकशुकाट पसरला होता. उरण तालुक्यातील सरकारी कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यासाठी मंगळवारी (दि.२१) पुकारलेल्या बेमुदत संपात विविध खात्यांचे सरकारी कर्मचारी सहभागी झाले होते.यावेळीसरकारी-निमसरकारी, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी, समन्वय समिती रायगडचे चिटणीस तथा सामाजिक कार्यकर्ते संतोष पवार यांनी बेमुदत संपाला संबोधित करताना सांगितले की, विविध कर्मचारी संघटनांनी आपल्या मागण्यांबाबत सरकारशी वारंवार चर्चा करूनही ठोस तोडगा न निघाल्याने सरकारी- निमसरकारी कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले आहे. कर्मचारी संघटना या आपल्या विविध मागण्यावर ठाम आहेत. तरी शासनाने जुन्या पेन्शन योजनेची अंमलबजावणी करावी, रिक्त पदांची भरती करावी, सेवेत असताना निधन झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मुलांना वारसा हक्काने नोकरीत सामावून घ्यावे. तसेच, इतर प्रलंबित आर्थिक मागण्यांची पूर्तता करण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा, असे सांगितले.



# दशरथ मुंडे यांची उप तालुकाध्यक्षपदी निवड



**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मनसेच्यावतीने पनवेल तालुक्यातील संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली आहे. दशरथ मुंडे यांची मनसे पनवेल उपतालुका अध्यक्षपदी अधिकृत निवड करण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात त्यांना जिल्हाध्यक्ष संदेश ठाकूर, तालुकाध्यक्ष सोनवणे यांच्याकडून निवडीचे पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दीपक पाटील, तालुका सचिव अल्पेश कडू, निर्दोष गोंधळी उपस्थित होते. दशरथ मुंडे यांच्या कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही मोठी जबाबदारी सोपवली आहे. या निवडीबद्दल त्यांनी पक्षप्रमुख राज ठाकरे आणि वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले.

# शासनाच्या असंवेदनशील भूमिकेवर नाराजी




(छायाचित्रः गौसखान पठाण)

**। सुधागड-पाली । प्रतिनिधी ।**

दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे सरकारी-निमसरकारी तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी संतप्त झाले आहेत. सुधागड तालुक्यातील कर्मचारी संघटनांनी मंगळवार दि.२१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे. कर्मचारी संघटनांनी शासनाला पुरेसा वेळ दिला असूनही चर्चेची संधी न देणाऱ्या शासनाच्या असंवेदनशील भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. कर्मचारी संघटनांनी 'अभी नहीं तो कभी नहीं, असे आवाहन देत संपात सहभागी होऊन एकजुटीचे दर्शन घडवण्याचे आवाहन केले आहे.



# मुरुडमध्ये कर्मचाऱ्यांचे आंदोलन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

मुरुडमध्ये राज्य सरकारी कर्मचारी आणि शिक्षक यांच्या दिर्घकाळ प्रलंबित असलेल्या रास्त मागण्यांबाबत सरकारी कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप आंदोलन सुरु केले आहे. दरम्यान सरकारी-निमसरकारी, जिल्हा परिषद शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, नगरपालिका व ग्रामपंचायत कंत्राटी कर्मचारी समितीचे मुरुड तालुका अध्यक्ष संतोष कचरे यांनी राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटना यांनी तयार केलेले निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यासाठी तहसीलदारांकडे देण्यात आले. सांप्रत सरकारने संवेदनशीलता दाखवून प्रलंबित मागण्यांबाबत त्वरीत सकारात्मक ठोस निर्णय घेऊन कर्मचारी-शिक्षकांना दिलासा द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावेळी राज्यभरातील १७ लाख सरकारी कर्मचारी-शिक्षक, गेले वर्षभराहून अधिक कालावधीत, शासनाकडून प्रलंबित मागण्यां संबंधात न्याय मिळेल या प्रतिक्षेत होते. या करीता विविध आंदोलनात्मक कृती करुन रास्त प्रलंबित मागण्यांकडे शासनाचा लक्षवेध करण्यासाठी लोकशाही पध्दतीने प्रयत्न केले. मात्र, कर्मचारी संघटनेस कोणताच सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही.

# अलिबागेत काव्य महोत्सव रंगणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

पीएनपी कला विकास मंडळ अलिबाग अंतर्गत साहित्य प्रभा या साहित्य मंडळामार्फत अलिबागमध्ये काव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. अलिबागमधील पीएनपी मध्यवर्ती कार्यालय येथे दि.१० मे रोजी सकाळी साडेदहा वाजता काव्य महोत्सव होणार आहे. या महोत्सवासाठी नवोदित, अनुभवी कवींना 'आठवणीतील माझी शाळा', 'हरवलेलं बालपण' आणि 'माती' यापैकी एका विषयावर कविता सादर करता येणार आहे. आपल्या आठवणी, अनुभव आणि भावना शब्दरूपा मांडण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.कविता जगली पाहिजे, कवितेची गोडी प्रत्येकाच्या मनात निर्माण झाली पाहिजे यासाठी काव्यप्रेमींनी या महोत्सवात सहभाग घ्यावा. इच्छुक कवींनी आपली कविता साहित्य मंडळाकडे दि.५ मेपर्यंत आगाऊ पाठवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. हा काव्य महोत्सव नवीन व अनुभवी कविंसाठी नवीन झळाळी देणारा ठरणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

# कर्मचाऱ्यांनी सरकारला धरले धारेवर

- माणगावमध्ये जोरदार धरणे आंदोलन
- शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र निषेद व्यक्त



**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव तहसील कार्यालयाच्या आवारात मंगळवारी सकाळी राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना तालुका शाखा माणगाव तसेच शिक्षक समन्वय समितीच्या संयुक्त विद्यमाने जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. आंदोलनादरम्यान कर्मचाऱ्यांनी घोषणाबाजी करत शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र निषेध व्यक्त केला. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय जाहीर करत प्रशासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाचे नेतृत्व तालुकाध्यक्ष राजेंद्र खाडे यांनी केले. आंदोलनात विविध मान्यवरांनी मार्गदर्शन करत कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर प्रकाश टाकला. यावेळी तहसीलदारांना विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. विशेषतः केंद्र शासनाच्या पीएफआरडीए संबंधित धोरणांचा निषेध करत ते रद्द करण्याची ठाम मागणी करण्यात आली. यावेळी शिक्षक समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष सुरेश पालकर, खजिनदार बुद्धकोश पवार, राज्य सरकारी मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस राजेश्वर दाढेल यांच्यासह शाम राठोड, खोपकर, तुषार सुर्वे, बावधने, तृप्ती पवार, भरत उतेकर, राजेश जाधव, जयेश कदम, प्रमिला मांगडे, सुविता ऐनकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# उत्पादन शुल्क अधीक्षकांच्या बदलीची मागणी

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात निर्जन तसेच डोंगर व जंगल परीसरात छुपे गावठी दारूची निर्मीती केंद्रे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षकांच्या कृपाशिर्वादाने सुरू असल्याची चर्चा नागरींकांत सुरू आहे. तसेच, राज्य उत्पादन शुल्क अधिक्षकांच्या कार्यक्षेत्रातील वाइन शॉप, परमिट रूम यांच्या परवनांचे नुतनिकरण ३१ मार्चपर्यंत करणे बंधनकारक आहे. त्यानुसार आपले परवाना लवकरात लवकर नुतनीकरण व्हावे, या हेतुने सर्व कागदपत्रे, दप्तर तपासणी व बॅकेत चलन भरून राज्य उत्पादन शुल्क कार्यालयात जाऊन संपुर्ण नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण करतात. त्यानंतर संबधीत विविध कागदपत्रे राज्य उत्पादन शुल्क जिल्हा अधिक्षकांकडे पाठविले जातात. परंतु, नुतनिकरणाकरीता आलेल्या कागदपत्रांमध्ये काहीतरी त्रुटी काढून संबधीत व्यावसाईकांना मुख्य साहेबांची भेट घ्यायला भाग पाडतात. त्याशिवाय त्यांच्या नुतनिकरणाच्या कागदावर स्वाक्षरी करीतच नाहीत, असा आरोप जिल्ह्यातील चालक-मालकांकडून होत आहे. या बाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणाची दखल घेऊन दोन वर्षे चालु असलेली आमची पिळवणुकी थांबवावी व या ठिकाणी एक चांगला कामसु अधिकारी शासनाने नियुक्त करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# कार्यशाळेचे आयोजन

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**

माथेरान नगरपरिषदेच्या शालेय शिक्षण क्रीडा व युवक कल्याण समितीची सभा सोमवारी नगरपालिकेच्या सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून बुधवारी (दि.२२) माथेरानमधील अंगणवाडीसह तिन्ही शाळांच्या पालकांसाठी कार्यशाळा आयोजित केली आहे. मनसोपचार तज्ज्ञ प्राजक्ता गांगल या मार्गदर्शन करणार आहेत. मुलांच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका व मोबाईलपासून मुलांना कसे दूर ठेवता येईल, या विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

घाम गाळणारा शेतकरी कोरडाच | मधल्या दलालांचा कोट्यवधींचा खेळ

# तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली लूट?

**। उरण । प्रतिनिधी ।**

'तिसऱ्या मुंबईसाठी २१६ एकर भूसंपादन' या गाजावाजाच्या वृत्तामागे शेतकऱ्यांची उघड दिशाभूल आणि फसवणूक लपलेली असल्याचा संतापजनक आरोप पुढे आला आहे. विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या या व्यवहारात बिल्डर आणि यंत्रणा एकाच साखळीत गुंतल्याची चर्चा स्थानिक शेतकऱ्यांमध्ये जोर धरत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पेण तालुक्यात काही वर्षांपूर्वी एका बिल्डरने 'स्मार्ट सिटी'चे स्वप्न दाखवत शेकडो एकर जमीन कवडीमोल दरात ताब्यात घेतली होती. आज त्याच जमिनींना सोन्याचा भाव देत सरकार अथवा एमएमआरडीएकडून विकत घेतले जात असल्याचे बोलले जात आहे. शेतकऱ्यांकडून १ ते १.५ लाख रुपये प्रति गुंठा दराने घेतलेल्या जमिनी आता २५ ते ३० लाख रुपये प्रति गुंठा दराने विकल्या गेल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. म्हणजे घाम गाळणारा शेतकरी कोरडाच, आणि मधल्या दलालांचा कोट्यवधींचा खेळ सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणातील आणखी धक्कादायक बाब म्हणजे, एसईझेड किंवा खासगी व्यवहारातून विकलेल्या जमिनी एमएमआरडीएच्या नावावर करून 'शेतकऱ्यांची संमती मिळाली' असा बनाव उभा करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा आहे. कागदोपत्री खेळ करून वास्तव झाकण्याचा हा डाव असल्याचा संशय व्यक्त होत आहे.एसईझेडसाठी संपादित करण्यात आलेल्या पेण व दादर परिसरातील सुमारे १ हजार एकर जमिनींचा या प्रक्रियेत समावेश असल्याचे सांगितले जात आहे. या जमिनींपैकी मोठा भाग सध्या खारफुटीने व्यापलेला असतानाही त्याचा वापर व्यवहारासाठी केला जात असल्याने या संपूर्ण प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर स्थानिक शेतकरी आणि नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट उसळत असून, विकासाच्या नावाखाली सुरू असलेल्या या व्यवहाराची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. काही वृत्त पेड न्यूजच्या माध्यमातून वातावरण तयार करण्यासाठी पसरवल्या जात असल्याचीही चर्चा असून, नागरिकांनी अशा बातम्यांवर आंधळा विश्वास ठेवू नये, असे आवाहन शेतकरी व त्यांच्या प्रतिनिधींकडून करण्यात येत आहे.



## एकसाथ शुरु कर!

आदेश झालेला आहे. एकसाथ शुरू कर असे म्हटले गेलेले आहे. त्यानुसार, आता महिला आरक्षण विधेयकाच्या निमित्ताने खोटा प्रचार सुरू झालेला आहे. भाजपचे मंत्रीसंत्री ते गल्लीतले नेते आता एका मुखाने बोलू लागले आहेत. संघाने हेच तर यांना शिकवलेले आहे. वरून आदेश आला की पोपटासारखे बोलायला लागायचे. खोटे असेल तर जास्त रेटून बोलायचे. पुन्हा पुन्हा तेच सांगत राहायचे. मग लोकांना तेच खरे आहे की काय असे वाटू लागते. आधी पंतप्रधानांचे राष्ट्राला उद्देशून भाषण झाले. त्यात ५०-६० वेळा काँग्रेसचे नाव घेतलेले होते. काँग्रेस महिलाविरोधी आहे, देशातील महिलांचा तिने अपमान केला आहे वगैरे. बाकी सध्या निवडणुका आहेत म्हणून बंगाल आणि तमिळनाडूतल्या तृणमूल आणि द्रमुकचीही नावे होती. वास्तविक हे प्रचाराचे भाषण होते. ते सरकारी माध्यमातून देश के नाम संदेश म्हणून प्रसारित करणे हा आचारसंहितेचा भंग असायला हवा होता. पण सध्या निवडणूक आयोग भाजपला गहाण पडला आहे. मध्यंतरी या आयोगाने थेट तृणमूल काँग्रेसचे नाव घेऊन धमक्या दिल्या होत्या. त्यामुळे त्याच्याकडून वेगळे काही घडण्याची अपेक्षा नाही. मोदींचे भाषण झाल्यावर गावगन्ना त्याच्या आवृत्त्या निघणार हे उघड होते. तसेच झाले. काल देवेंद्र फडणवीसांनी पत्रकार परिषद घेतली. तिच्यात पुन्हा काँग्रेस आणि विरोधकांवर टीका केली. शिवाय आपण आपल्या लेव्हलच्या कोणाशीही खुली चर्चा करायला तयार आहोत असे तथाकथित आव्हान दिले. त्या निमित्ताने एक बरे झाले. विरोधकांमध्ये आपल्या लेव्हलचे काही लोक आहेत किंवा असू शकतात हे देवेंद्रांनी मान्य केले. आपण स्वयंभू जन्माला आलो आणि देवानेच आपल्याला पृथ्वीवर धाडले आहे असे भास त्यांना अजून तरी होत नाहीत. देवेंद्रांना लगोलग सुप्रिया सुळे, प्रणिती शिंदे अशा अनेकांनी प्रतिआव्हान दिले आहे. ते स्वीकारण्याची शक्यता नाहीच. पण देवेंद्रांनी इतर जी विधाने केली ती गमतीदार होती.

### सुचेता, नंदिनी, इंदिरा, सोनिया

काँग्रेसने आजवर कोणाही महिलेला मुख्यमंत्री केले नाही, सबब तो पक्ष महिलाविरोधी आहे असा दावा फडणवीस यांनी केला. काँग्रेसने भूतकाळात असंख्य चुका केल्या. काही गुन्हेही केले. त्याची फळे तिला तेव्हा आणि आता मिळत आहेत. पण याच काँग्रेसच्या काळात अनेक चांगल्या गोष्टीही झाल्या. मुख्य म्हणजे काँग्रेसच्या काळात आजच्या भाजपच्या राजवटीपेक्षा मिडिया अधिक चांगला होता, प्रश्न विचारू शकत होता. प्रागतिकता व बुध्दिवादीपणा ही मूल्ये मानली जात होती. गायीचे शेण आणि गोमूत्रात अखिल जगाचे प्रश्न सोडवण्याची शक्ती आहे असला मूर्ख प्रचार सरकारी पैशाने केला जात नव्हता. याच काँग्रेसने महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण लागू केले. शिवाय, महाराष्ट्रात मुख्यमंत्री महिला झाली नसेल. पण स्वातंत्र्यांच्या पूर्वीच्या काळापासून गांधी व नेहरुंमुळे महिला स्वातंत्र्यलढ्यात उतरल्या व नंतर राजकारणातही त्यांनी उत्तम कामगिरी बजावली. १९४७ मध्ये नौखालीमध्ये हिंदू-मुस्लिम दंगे थांबवायला गांधीजी गेले तेव्हा त्यांच्यासोबत सुचेता कृपलानी होत्या. याच सुचेता घटना समितीच्या सदस्य झाल्या. त्या आधी काँग्रेसमध्ये नव्हत्या. पण १९६० च्या दशकात उत्तर प्रदेशसारख्या मागास राज्यात त्या काँग्रेसच्या मुख्यमंत्री झाल्या. देशातल्या त्या पहिला महिला मुख्यमंत्री. नंदिनी सत्पथी या डाव्या कम्युनिस्ट विद्यार्थी आंदोलनातून पुढे आल्या. नंतर काँग्रेसमध्ये गेल्या. ओरिसाच्या मुख्यमंत्री झाल्या. सर्वात महत्वाचे म्हणजे इंदिरा गांधी नावाच्या एक नेत्या होत्या. देवेंद्रांनी त्यांचे नाव नक्की ऐकले असेल. त्या सुमारे १४ वर्षे देशाच्या पंतप्रधान होत्या. बांगलादेशाचे युध्द जिंकणे, बँकांचे राष्ट्रीयकरण, अणुस्फोट करणे, केरळातील सायलेंट व्हॅली वाचवणे, अंटार्क्टिकावर पहिली मोहिम धाडणे अशा गोष्टी त्यांच्या नावावर जमा आहेत. त्यांनी काही वाईट गोष्टी केल्या. पण लोकशाही मार्गाने त्यांची फळेही भोगली. नंतर सोनिया गांधी नावाच्या एक नेत्या होत्या. भाजपवाले यांच्या नावाने शंख करीत असत. मनमोहनसिंग पंतप्रधान झाले तरी खऱ्या नेत्या सोनिया आहेत अशी टीका करून वाजपेयी ते अडवानी ते मोदी यांनी दिवस काढले. मनरेगा आणि माहितीचा अधिकार ही दोन कामे सोनियांच्या आग्रहामुळे मार्गी लागली. याखेरीज त्यांनी कधीही सरकारच्या कारभारात अतिरिक्त हस्तक्षेप केला असे दिसले नाही.

### मूर्ख बनवणे थांबवा

मोदी काय वाट्टेल ते म्हणत असले तरी सोनियांनी भ्रष्टाचार केला असे एकही प्रकरण दिसलेले नाही. याच सोनियांना भाजपच्या महिला नेत्यांनी पंतप्रधान होण्यास विरोध केला. कारण काय तर सोनिया मूळच्या इटलीच्या आहेत. पण राजीव गांधी यांच्या हत्येनंतर त्यांना शक्य असूनही त्या इटलीला किंवा युरोपात परत गेल्या नाहीत, इथेच राहिल्या, इतकेच नव्हे तर काँग्रेस आपल्या तत्वांना बांधील राहील हे पाहिले हे त्यांचे मोठे योगदान आहे. या पार्श्वभूमीवर, भाजप किंवा त्यापूर्वीचा जनसंघ काय दिवे किंवा पणत्या लावत होता हे सर्वांसमोर आहे. स्वातंत्र्य आंदोलनात संघातले पुरुषही नव्हते. तेव्हा महिला असण्याचा संबंधच नाही. गोळवलगुरुजी वगैरे तर महिलांना बरोबरीच्या नात्याने वागवत नव्हते. आताचे भागवत वगैरेही फार मान देतात असे नव्हे. महिलांना कुटुंब सांभाळायला हवे असेच उपदेश करत हे फिरत असतात. म्हणूनच संघाच्या निर्णयप्रक्रियेत आजवर एकही महिला दिसलेली नाही. जनसंघ किंवा नंतर भाजपमध्येही केवळ अपवादानेच महिला दिसल्या आहेत. महाराष्ट्रात वेगळे चित्र असण्याचे कारण नाही. महाराष्ट्रात आजवर काँग्रेसमुळे एकही महिला मुख्यमंत्री होऊ शकलेली नाही असे देवेंद्रांना वाटत असेल तर त्यांनी भाजपमधील महिलेला तात्काळ मुख्यमंत्री करावे. आपण लोकांच्या मनातल्या मुख्यमंत्री आहोत असे पंकजा मुंडे यांनी पूर्वी जाहीर केले होते. आता तर त्यांचा आवाजही ऐकू येईनासा झाला आहे. ताबडतोब त्यांना खरोखरीच्या मुख्यमंत्री करावे. मोदींच्या मंत्रिमंडळात केवळ सात मंत्री आहेत. तिथे किमान ३३ टक्के पदे महिलांना देण्याचा आग्रह धरावा. येणाऱ्या सर्व निवडणुकांमध्ये भाजप ५० टक्के महिलांना उमेदवारी देईल असे त्वरीत जाहीर करावे. काँग्रेस हा एक नादान पक्ष असेल तर त्याच्या कर्माची फळे तो भोगेल. त्यासाठी नरेंद्रापासून देवेंद्राप्रर्यंत सर्वांनी आपले कामधंदे सोडून देऊन प्रचार करीत बसण्याची गरज नाही. भाजपच्या कारभारातूनच त्यांनी धडा घालून द्यावा. सर्वात मुख्य मुद्दा असा आहे की, महिला आरक्षण २०२३ मध्येच एकमताने मंजूर झाले आहे. ते ५४३ जागांसाठी लागू करणे शक्य होते व अजूनही आहे. पण मोदी सरकार ते करीत नाही. कारण त्यांना महिला आरक्षणाच्या आडून लोकसभा मतदारसंघांची फेररचना करून जागा वाढवून घ्यायच्या आहेत. या सरसकट जागावाढीमुळे दक्षिणेतील राज्यांवर अन्याय होणार आहे. पण ही गोष्ट दडवून टाकायची आहे. त्यासाठीच संसदेतला तमाशा करण्यात आला हे फडणवीस सांगत नाहीत. सर्व लोकांना सर्व काळासाठी मूर्ख बनवता येत नसते ही इंग्रजी म्हण त्यांना ठाऊक असेलच.

---

विचार

# युद्धज्वर वर-खाली, झळा वाढत्याच

***आखाती युद्ध केवळ भूराजकीय संघर्ष नसून जागतिक अर्थव्यवस्थेच्या मुळावर घाव घालणारे संकट ठरते. तेलाच्या किमतींपासून रोजगारापर्यंत प्रत्येक स्तरावर त्याचे परिणाम दिसून येतात. अशा वेळी दीर्घकालीन उपाययोजना, पर्यायी ऊर्जा स्रोतांचा विकास, आर्थिक स्वावलंबन आणि स्थिर धोरणे यांची गरज अधिक तीव्रतेने जाणवते. अन्यथा, प्रत्येक जागतिक संघर्षासोबत अर्थव्यवस्थेची हीच घसरण पुन्हा पुन्हा अनुभवावी लागेल.***

**हेमंत देसाई**

आखाती प्रदेशातील युद्ध हे केवळ दोन-तीन देशांपुरते मर्यादित राहात नाही, तर त्याचे पडसाद संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात. तेलसंपन्न आखाती देश जागतिक ऊर्जा पुरवठ्याचे केंद्र असल्यामुळे तेथील अस्थिरता ही थेट आर्थिक अस्थिरतेत रूपांतरित होते. अशा युद्धपरिस्थितीत सर्वप्रथम फटका बसतो तो कच्च्या तेलाच्या किमतींना. तेलाच्या किमती झपाट्याने वाढू लागल्या की वाहतूक, उत्पादन, वीजनिर्मिती अशा सर्वच क्षेत्रांवर परिणाम होतो आणि महागाईचा भडका उडतो. भारतासारख्या तेलआयात-निर्भर देशासाठी ही परिस्थिती अधिकच गंभीर ठरते. आयातीवरील खर्च वाढल्याने चालू खाते तुटीवर ताण येतो, रुपयाचे अवमूल्यन होते आणि सरकारसमोर आर्थिक संतुलन राखण्याचे मोठे आव्हान उभे राहते. पेट्रोल-डिझेलच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या खिशावर थेट परिणाम होतो, तर उद्योगक्षेत्रासाठी उत्पादनखर्च वाढतो. परिणामी, बाजारातील मागणी घटते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावतो. या पार्श्वभूमीवर कॉर्पोरेट कंपन्यांच्या नफ्यावर मोठा परिणाम दिसून येतो. उत्पादनखर्च वाढणे, कच्च्या मालाच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होणे आणि जागतिक मागणीत घट होणे या कारणांमुळे कंपन्यांच्या नफ्याचे प्रमाण कमी होते. अनेक कंपन्यांना खर्च कमी करण्यासाठी उपाययोजना कराव्या लागतात. त्यात नवीन प्रकल्पांना स्थगिती देणे, विस्तार योजनांना ब्रेक लावणे किंवा कर्मचाऱ्यांची कपात करणे यांचा समावेश असतो. अशा परिस्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राची जोखीम घेण्याची क्षमता कमी होते आणि दीर्घकालीन गुंतवणुकीचे निर्णय पुढे ढकलले जातात. असे गंभीर परिणाम होत असल्याने परिस्थितीचा वेध घ्यायला हवा.

युद्धामुळे निर्माण झालेली अनिश्चितता ही गुंतवणूकदारांसाठी सर्वात मोठा अडथळा असते. देशांतर्गत तसेच परदेशी गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळतात. शेअर बाजारात चढ-उतार वाढतात. भांडवली बाजारातील विश्वास कमी होतो आणि नवीन गुंतवणुकीचा ओघ मंदावतो. परकीय गुंतवणूक घटल्यास तंत्रज्ञान हस्तांतरण, रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक वाढ यांवरही नकारात्मक परिणाम होतो. या सर्व प्रक्रियेचा फटका बसतो तो रोजगार क्षेत्राला. उद्योगांमध्ये उत्पादन कमी झाले, गुंतवणूक थांबली आणि नफा घटला की कंपन्या सर्वप्रथम मनुष्यबळावर गदा आणतात. नवीन भरती थांबते, कंत्राटी कर्मचाऱ्यांची कपात होते आणि काही वेळा कायमस्वरूपी नोकरकपातही केली जाते. सेवाक्षेत्रातही याचा परिणाम जाणवतो, कारण ग्राहकांचा खर्च कमी झाल्याने व्यवसायांवर ताण वाढतो. परिणामी मध्यमवर्गीय तसेच निम्नवर्गीय कुटुंबांची आर्थिक घडी विस्कटते. युद्धाचा परिणाम केवळ थेट आर्थिक आकड्यांपुरता मर्यादित राहत नाही, तर समाजाच्या मानसिकतेवरही परिणाम करतो. अनिश्चिततेमुळे लोक खर्च करण्यापेक्षा बचतीकडे वळतात. त्यामुळे बाजारातील मागणी आणखी घटते. हीच साखळी अर्थव्यवस्थेच्या मंदीला अधिक गती देते. जागतिक स्तरावर व्यापारमार्गांमध्ये अडथळे निर्माण झाल्यास निर्यात-आयात व्यवहारांवरही परिणाम होतो आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियेलाच धक्का बसतो. अशा परिस्थितीत सरकारसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवणे, आर्थिक वाढ टिकवून ठेवणे आणि रोजगारनिर्मितीला चालना देणे या तिन्ही गोष्टी एकाच वेळी साध्य करणे कठीण होते.

यातून वित्तीय तूट वाढण्याचा धोका निर्माण होतो, तर सामाजिक कल्याण योजनांवरील खर्च वाढवण्याची गरजही भासते. त्यामुळे आर्थिक धोरणे आखताना संतुलन साधणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. पश्चिम आशियातील इराण विरुद्ध अमेरिका-इस्रायल यांच्यातील भीषण संकटाच्या छाया आता भारतीय अर्थव्यवस्थेवर पडू लागल्या आहेत. या युद्धाचा फारसा परिणाम होणार नाही आणि आम्ही विशेष काळजी घेतली आहे, असे केंद्र सरकारतर्फे सांगण्यात येत असले, तरी इतर देशांप्रमाणे भारतावरही विपरीत परिणाम होणार आहे, हे स्पष्ट आहे. 'मूडीज' या जागतिक पतमानांकन संस्थेने २०२६-२७ साठी भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या, म्हणजेच जीडीपीच्या वाढीचा अंदाज ६.८ टक्क्यांवरून सहा टक्के इतका खाली आणला आहे. याचे कारण या युद्धामुळे होर्मुझ खाडीमधील वाहतूक अनेक देशांसाठी बंद झाली आणि अन्यत्रही क्षेपणास्त्र हल्ले सुरू असल्यामुळे जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाली. भारताला लागणाऱ्या एकूण कच्च्या तेलापैकी ५५ आणि एलपीजीपैकी ९० टक्क्यांपेक्षा जास्त पुरवठा याच युद्धग्रस्त भागातून होतो. खतांच्या आयातीवर परिणाम झाल्यामुळे खाद्यपदार्थांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे २०२४-२५ मध्ये २.४ टक्के असलेली सरासरी महागाई आता ४.८ टक्क्यांपर्यंत जाण्याचा अंदाज आहे. यापूर्वी, म्हणजे १९७३ मध्ये तेल निर्यातदार राष्ट्रांनी अचानकपणे इंधनाचे दर वाढवल्यामुळे भारतावर महासंकट कोसळले होते. त्यावेळी याच्या परिणामी, तसेच सातत्याच्या दुष्काळामुळे भाववाढीचे संकट कोसळले होते.

आजघडीला भारताची आर्थिक स्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली आहे. अन्नधान्याची टंचाई केव्हाच दूर झाली आहे. परंतु तरीही आताचा काळ जागतिकीकरणाचा असल्यामुळे पूर्वीपेक्षा आता युद्धजन्य स्थितीचे फटकेही जास्त बसण्याची शक्यता असते. याचे कारण परदेशांतून भारतात येणाऱ्या पैशांपैकी ४० टक्के वाटा हा आखाती देशातून येतो. त्याचप्रमाणे उदारीकरणानंतर जागतिक व्यापारातील भारताचा हिस्सा हळूहळू वाढत आहे आणि वेगवेगळ्या वस्तूंची व सेवांची निर्यात भारत करू लागला आहे. युद्धाच्या वणव्यामुळे अमेरिकेतील इंधनदराने सर्व विक्रम मोडीत काढले आहेत. युद्धापूर्वी तीन डॉलर प्रति गॅलनच्या खाली असलेले पेट्रोल दर चार डॉलरच्या पार गेले. तर मालवाहतुकीसाठी कणा मानल्या जाणाऱ्या डिझेलच्या किमतीत युद्ध सुरू झाल्यापासून ४७ टक्क्यांची वाढ झाली आणि त्याचे दर ५.५० डॉलर प्रति गॅलनपर्यंत पोहोचले. युरिया आणि खतांच्या किमती वाढल्याने अमेरिकन शेतकऱ्यांवर सुमारे ५० हजार डॉलर्सचा अतिरिक्त बोजा पडला आहे. त्याचप्रमाणे कम्प्युटर चिप्स बनवण्यासाठी लागणाऱ्या हेलियम वायूचा ३५ टक्के पुरवठा कतारमधून होतो. हा पुरवठा थांबल्याने सिलिकॉन व्हॅलीतील टेक कंपन्यांवर मोठे संकट कोसळले आहे. रुग्णालयातील एमआरआय उपकरणासाठी हेलियम अनिवार्य असतो, ज्याची टंचाई आता दूर व्हायला हवी. होर्मुझची नाकेबंदी अधिक काळ सुरू राहिल्यास अमेरिकेमध्ये मंदी येणे अटळ आहे. अमेरिकेचा २०२६ मधील विकासदर २.६ टक्क्यांवरून थेट एक टक्क्यावर येण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

याचा अर्थ अमेरिका पुन्हा एकदा १९७० च्या दशकातील 'स्टॅगफ्लेशन'सारख्या परिस्थितीत पोहोचू शकते. अशा परिस्थितीत विकासदर कमी आणि महागाई जास्त असते. शिवाय युद्ध थांबले तरी बंद झालेल्या तेलविहिरी पुन्हा सुरू होण्यासाठी अनेक महिने लागतात. तसेच युद्धात उद्ध्वस्त झालेल्या पायाभूत सुविधांच्या दुरुस्तीला काही वर्षे लागू शकतात. त्यामुळे इंधन दर पूर्वीच्या स्तरावर येण्याची शक्यता कमीच आहे. अमेरिकेची स्थिती अशी राहिल्यास भारतासारख्या मोठी अर्थव्यवस्था असलेल्या देशांनाही चटके बसणार, हे स्पष्ट आहे. वास्तविक, यापूर्वी देशांतर्गत अर्थव्यवस्थेमध्ये पैशांचा ओघ वाढला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, सर्वसामान्य नागरिक असो वा मोठे उद्योग समूह, आपल्या गरजा आणि विस्तारासाठी बँकांकडे कर्ज मागणाऱ्यांचे प्रमाण वेगाने वाढत आहे. देशातील ९५ टक्के बाजारपेठ व्यापणाऱ्या ४१ प्रमुख बँकांकडून गोळा केलेल्या माहितीनुसार, उद्योगांना देण्यात येणाऱ्या कर्जामध्ये मोठी झेप पाहायला मिळाली आहे. गेल्या वर्षी उद्योगांची कर्जवृद्धी केवळ साडेसात टक्के होती. ती आता वाढून १३.५ टक्के झाली आहे. पायाभूत सुविधा अभियांत्रिकी, रसायने, पेट्रोलियम आणि कापड उद्योगांतून कर्जाची सर्वाधिक मागणी दिसून आली आहे. या क्षेत्रात १६.१६ टक्के वाढ झाली असून, प्रामुख्याने एनबीएफसी आणि कमर्शियल रियल इस्टेट क्षेत्राकडून मोठी मागणी आली आहे. वैयक्तिक कर्ज विभागात १५. टक्क्यांची वाढ झाली आहे. गृहकर्जामध्ये स्थिरता दिसत असली, तरी वाहनकर्ज आणि गोल्ड लोन घेणाऱ्यांच्या संख्येत वाढ झाली आहे. कृषी आणि संबंधित कामासाठीच्या कर्जातही १२ टक्क्यांची सुधारणा झाली आहे. अर्थात ही आकडेवारी युद्धापूर्वीची, फेब्रुवारी महिन्यातील आहे. त्यानंतरच्या परिस्थितीत जमीन-अस्मानाचा फरक पडला आहे. त्यामुळे बदलत्या स्थितीत कॉर्पोरेट क्षेत्राचे नफे १५ टक्क्यांनी तरी कमी होतील, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कंपन्यांचे नफे पावणेतीन लाख कोटी रुपयांनी, म्हणजेच जीडीपीच्या ०.८ टक्क्यांनी घटण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा अंदाज भारतीय स्टेट बँकेने व्यक्त केला आहे. तसे घडल्यास, बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे रोजगारनिर्मितीचा वेगही घटणार आहे. या सर्व लक्षात शक्यता लक्षात घेऊन केंद्र व राज्य सरकारांना योग्य ती पावले टाकावी लागणार आहेत.

---

चर्चा आजची

# जनता चिखलात, अधिकारी एसीत!



**राकेश लोहार**

अवकाळी पावसाने रायगड जिल्ह्यातील रस्ते कामांचा फज्जा उडाला आणि प्रशासनाच्या नियोजनशून्यतेचे विदारक चित्र समोर आले. नागरिक चिखलात अडकले असताना, अधिकारी मात्र कार्यालयात बसून परिस्थितीकडे दुर्लक्ष करत असल्याचा तीव्र आरोप होत आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या दोन दिवसांपासून झालेल्या अवकाळी पावसाने केवळ वातावरण ढवळून काढले नाही, तर प्रशासनाच्या कारभाराचा पाया किती कमकुवत आहे, हेही उघड केले. अलिबाग आणि मुरुड तालुक्यांमध्ये सुरू असलेल्या रस्ते रुंदीकरणाच्या कामांनी आधीच नागरिकांचे कंबरडे मोडले होते; त्यात पावसाने भर टाकत जनतेला अक्षरशः चिखलात लोटले.

रस्ते खोदून ठेवणे, गटारे अर्धवट सोडणे, मोऱ्यांची कामे महिनोन्महिने प्रलंबित ठेवणे आणि सर्वत्र मातीचे ढीग टाकून ठेवणे, हीच सध्याच्या कामांची ओळख बनली आहे. पावसाचे पाणी साचताच ही माती रस्त्यावर पसरली आणि संपूर्ण परिसर दलदलित बदलला. नागरिकांना दररोजच्या प्रवासासाठी जीव धोक्यात घालावा लागत आहे. दुचाकीस्वार घसरत आहेत, चारचाकी वाहनचालकांचा ताबा सुटण्याची भीती निर्माण झाली आहे, तर पादचाऱ्यांची अवस्था तर अधिकच बिकट आहे. ही सर्व कामे एमएमआरडीए आणि एमएसआयडीसी यांच्या माध्यमातून सुरू आहेत. मात्र, स्थानिक परिस्थिती, पावसाचा अंदाज, जमिनीचा स्वभाव आणि निचऱ्याच्या समस्या याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आल्याचे स्पष्ट दिसत आहे. प्रश्न असा आहे की, इतक्या तक्रारी होऊनही अधिकारी नेमके काय पाहत आहेत?

अलिबाग हे जिल्ह्याचे मुख्यालय. दररोज हजारो लोक येथे कामानिमित्त ये-जा करतात. एसटी बस, रिक्षा, खासगी वाहने सर्वच वाहतुकीवर या परिस्थितीचा गंभीर परिणाम झाला आहे. रस्त्यांची ही अवस्था पाहता आपत्कालीन सेवांनाही अडथळा निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. एखादी रुग्णवाहिका वेळेत पोहोचू शकणार का? अग्निशमन दलाला मार्ग मिळणार का? याची कुणालाही खात्री नाही. गेल्या सहा महिन्यांपासून नागरिक रस्त्यांच्या कामांमुळे होणारा त्रास सहन करत आहेत. धूळ, खड्डे, वाहतूक कोंडी आणि आता चिखल या सगळ्यांचा सामना करताना जनतेचा संयम संपत आला आहे. तरीही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कृती दिसत नाही. कामे वेळेत पूर्ण करण्याऐवजी नवीन ठिकाणी खोदकाम सुरू ठेवण्याचा हट्ट नेमका कोणासाठी? मोऱ्यांची कामे अपूर्ण असल्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह बदलला आहे. अनेक ठिकाणी गटारे अडथळ्यांनी भरलेली आहेत. मातीचे ढीग हटवले गेलेले नाहीत. परिणामी, पाण्याचा निचरा होत नाही आणि पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता वाढली आहे. यंदाच्या पावसाळ्यात अनेकांच्या घरात पाणी शिरण्याचा धोका निर्माण झाला असून, त्याची पूर्ण जबाबदारी प्रशासनावरच राहणार आहे. अवकाळी पावसाने जर अशी दयनीय अवस्था झाली, तर मुसळधार पावसात परिस्थिती किती भयानक होईल, याचा विचारही करवत नाही. तरीही अधिकारी मात्र गप्प आहेत. ना ठोस योजना, ना तातडीची उपाययोजना; केवळ कागदोपत्री कामे आणि प्रत्यक्षात शून्य अंमलबजावणी, अशी स्थिती आहे. अधिकाऱ्यांचा हा बेफिकीरपणा केवळ त्रासदायक नाही, तर धोकादायकही आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होईल, अशा पद्धतीने कामे सुरू ठेवणे म्हणजे सरळसरळ दुर्लक्ष आणि निष्काळजीपणा आहे. "पाऊस आला की पाहू" या मानसिकतेतून बाहेर येण्याची गरज आहे. जनतेचा संयम संपत चालला आहे. वारंवार तक्रारी करूनही काहीच बदल होत नसेल, तर नागरिक रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत. प्रशासनाने हे गांभीर्याने घेतले नाही, तर येणाऱ्या काळात तीव्र आंदोलनाची ठिणगी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आता कारवाई होणे गरजेचे आहे. ठेकेदारांनाही जबाबदार धरले पाहिजे. अन्यथा, अशा प्रकारचे प्रकार पुन्हा पुन्हा घडत राहतील आणि त्याचा फटका नेहमीप्रमाणे सामान्य जनतेलाच बसेल. आजची चिखलमय अवस्था ही केवळ नैसर्गिक आपत्ती नसून, प्रशासनाच्या अकार्यक्षमतेची आणि निष्काळजीपणाची जिवंत साक्ष आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. कामे तातडीने पूर्ण करा, निचऱ्याची व्यवस्था सुरळीत करा आणि नागरिकांना दिलासा द्या. नाहीतर "जनता चिखलात, अधिकारी एसीत" हीच ओळख कायम राहील.

---

लोकसंसद

## संपापेक्षा मराठी भाषा शिकून घ्या

महाराष्ट्रात १ मे २०२६ पासून मराठी न येणाऱ्या रिक्षा-टॅक्सी चालकांचे परवाने रद्द करण्याच्या निर्णयाविरुद्ध चालक संघटनांनी दिलेला संपाचा इशारा हा प्रवाशांना वेठीस धरण्याचाच प्रकार आहे. सार्वजनिक सेवा देणाऱ्या या क्षेत्राने जबाबदारीची जाणीव ठेवणे अपेक्षित असताना, संपाचा मार्ग स्वीकारणे हा प्रश्न सोडवण्याऐवजी तो अधिक गुंतागुंतीचा करणारा आहे. महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी येणे ही अपेक्षा अन्यायकारक नाही. उलट, प्रवाशांशी सुसंवाद साधण्यासाठी ती अत्यावश्यकच आहे. तरीही "मराठी येत नसली तरी व्यवहारात अडचण येत नाही" असे विधान या संघटनेचे अध्यक्ष शशांक राव यांनी करणे हे वास्तवाशी विसंगत आहे. महत्त्वाचा मुद्दा असा की, मराठी शिकण्याबाबतचे परिपत्रक नवे नाही. ते आधीपासून अस्तित्वात असताना त्याकडे दुर्लक्ष का करण्यात आले, हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. आता त्याची अंमलबजावणी होत असताना त्याला विरोध करणे म्हणजे स्वतःच्या दुर्लक्षाचे समर्थन करण्यासारखे आहे. खरंतर, संघटनांनी पुढाकार घेत आपल्या सदस्यांना मराठी शिकण्यासाठी प्रवृत्त केले असते, तर हा वाद उद्भवलाच नसता. एकवेळ शासनाकडे मुदतवाढ मागणे समजू शकते; परंतु थेट संपाची धमकी देणे हे योग्य नाही. महाराष्ट्रात राहून मराठी शिकली नाही तरी चालते, हा गैरसमज आता मोडीत काढण्याची वेळ आली आहे. संप हा उपाय नाही; संवाद, सहकार्य आणि भाषा आत्मसात करण्याची तयारी हाच योग्य मार्ग आहे.

– दीपक काशिराम गुंडये, वरळी.

---

दिनविशेष

# 'जागतिक वसुंधरा दिन'

जगभरात दरवर्षी २२ एप्रिल हा दिवस पृथ्वी दिवस किंवा 'जागतिक वसुंधरा दिन' म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात अमेरिकेमध्ये १९७० मध्ये जॉन मॅकोनेल यांनी केली होती. पृथ्वीवरील पर्यावरणाचे रक्षण करण्याबद्दल जागरूकता निर्माण करणे, हा या दिनामागचा उद्देश आहे. एकूण १९३ देशांमध्ये हा दिवस साजरा केला जातो. आपण पर्यावरणाची काळजी न घेतल्यामुळे अनेक नैसर्गिक आपत्ती जगभरात निर्माण झाल्या आहेत. त्यातील एक म्हणजे हवामान बदल होय, जो आपण सर्वजण अनुभवत आहोत.

**हा नाश थांबवा भूमातेचे तनमन**
**जळते आहे । ही वसुंधरा प्लॅस्टिकच्या**
**विळख्याने रडते आहे।।**

पर्यावरणावर दुष्परिणाम करण्यासाठी बरेच घटक कारणीभूत आहेत, त्यातील एक म्हणजे प्लॅस्टिक. प्लॅस्टिक हा अत्यंत उपयोगी असा पदार्थ आहे. परंतु, त्याचा वापर गेल्या काही वर्षात भरमसाठ वाढलेला आहे. त्याचा दुष्परिणाम सर्व पर्यावरणावर व मानवाच्या आरोग्यावर होत आहे. जगातील एकूण लोकसंख्या ही ७३० कोटी इतकी आहे तर त्याचबरोबर या पृथ्वीवर पडून असलेलं एकूण प्लॅस्टिक याची संख्या पाहता ती ८३० कोटी टन इतकी आहे. म्हणजे आज सरासरी प्रत्येक माणसाच्या नावावर अबाल वृद्धांपर्यंत सर्वांच्या नावावर बाराशे किलो कचरा आपल्या या पृथ्वीवर पडून आहे, यापैकी काही जमिनीवर तर काही नदी, नाले, समुद्रात. भारतात दिवसाला २.५ कोटी किलो प्लॅस्टिक वेस्ट तयार होतं. जगभरातून २० लाख साध्या प्लॅस्टिक पिशव्या प्रत्येक मिनिटाला कचऱ्यात पडत आहेत. - प्रत्येक मिनिटाला दहा लाख प्लॅस्टिक बाटल्या या कचऱ्यात टाकल्या जात आहेत. तयार झालेला सर्व प्लॅस्टिक कचरा हा इतर कचऱ्यामध्ये मिक्स होऊन कचरा डेपोमध्ये जातो. तो एकतर तिथे जाळला जातो किंवा तसाच पडून राहतो, किंवा ऊन वाऱ्यामुळे उडून जाणारा कचरा हा गटारी, नदी, नाले यामध्ये जाऊन अडकतो. प्लॅस्टिक कचऱ्याचे विघटन होत नाही. जमिनीवर पडून राहिलेला प्लॅस्टिक कचरा कालांतराने त्याचे फक्त छोट्या प्लॅस्टिकच्या तुकड्यांमध्ये रूपांतर होते. त्यालाच मायक्रो प्लॅस्टिक असं म्हणतात आणि हेच मायक्रो प्लॅस्टिक वेगवेगळ्या माध्यमातून प्राणी पक्षी तसंच माणसाच्याही पोटात जाऊ शकते. जमिनीवर पडून पडून ते जमिनीखाली एका विशिष्ट स्तरावर जाऊन अडकून राहते.तसंच जे प्लास्टिक गटारी, नदी-नाले, समुद्रात जाऊन पडतं त्यामुळे गटारी तुंबतात नदी समुद्रात प्लास्टिक तरंगताना आपल्याला आढळतं. या व्यतिरिक्त उरलेला जो कचरा जाळला जातो त्यामध्ये जे प्लास्टिक मिसळलेले असते त्यामुळे टॉक्सिक केमिकल वातावरणात मिसळले जातात. वायु प्रदूषण होते. या सगळ्यामुळे आपल्याला विविध आजारांना सामोरे जावे लागते. फुफुसाचे आजार, स्किनचे आजार किंवा कॅन्सर सारखे आजार देखील उद्भवतात. आज कॅन्सर चे प्रमाण वाढण्यास प्लास्टिक हा एक अतिशय महत्त्वाचा आणि मोठा घटक ठरला आहे. काही वेळा घरातील उरलेलं अन्न किंवा उरलेलं पार्सल हे ज्यावेळी आपण आहे असं प्लास्टिकच्या पिशवी सहित कचराकुंडीत टाकतो किंवा उघड्यावर टाकतो तेव्हा त्यातील अन्नाच्या वासाने अनेक प्राणी ते अन्न खाण्यासाठी तिथे येतात. ते प्राणी ते अन्न त्या प्लास्टिक पिशवी सहितच खातात. तेव्हा त्यांच्या पोटात प्लास्टिक जाऊन ते प्राणी दगावतात. याचे अनेक उदाहरणे आपण स्वतः पाहिलेली आहेत आणि वाचलेलीही आहेत. संपूर्ण जगाचा विचार करता आपली एकूण पाच महासागर आहेत पैकी एका पॅसिफिक महासागरातील प्लास्टिक जर बाहेर काढून जर ते जमिनीवर ठेवायचं म्हणलं तर अर्धे विश्रामबाग नाही, अर्धी सांगली नाही, अर्धा महाराष्ट्र नाही तर अर्धा भारत तीन फूट उंचीने खचाखच भरेल इतका प्लास्टिक कचरा केवळ त्या एक नंबरच्या पॅसिफिक महासागरात आपल्या आढळेल. उरलेल्या चार महासागरांचा विचार आपण इथं केलेला देखील नाही. याच महासागराला म्हणजेच ग्रेट पॅसिफिक गार्बेज पॅच असंही आता म्हणतात. सर्वसाधारण पाच लाख कोटी प्लास्टिक आजच्या घडीला पाण्यात तरंगत आहे.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२२ एप्रिल
१) श्री. विलास कृष्णा म्हात्रे
धोकवडे, अलिबाग
२२-४-१९५८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. सुनंदा परशुराम घरत, ८ वा स्मृतिदिन, कवळे वाडी,थळ अलिबाग**

**श्री. चंद्रकांत धर्मा केंदकी, वाढदिवस, बोरिस, नवगाव, अलिबाग**

# सिडकोचा ‘फाईल’ कारभार रामभरोसे

## नागरिकांचे मालकी हक्क धोक्यात; भूखंड नोंदींचे डिजिटलायझेशन करा

### • सजग मंचाची मुख्यमंत्र्यांकडे धाव

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

**सिडकोच्या वसाहत विभागातून भूखंडांशी संबंधित संवेदनशील फाईल्स गहाळ होणे व चोरीला जाण्याच्या घटना समोर येत आहेत. यामुळे नवी मुंबईतील लाखो सदनिकाधारक व भूखंडधारकांच्या मालकी हक्कावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर ‘सजग नागरिक मंचा’ने आक्रमक भूमिका घेत सिडकोच्या सर्व मालमत्ता नोंदींचे तातडीने डिजिटलायझेशन करण्याची मागणी मुख्यमंत्री व सिडको व्यवस्थापकीय संचालकांकडे निवेदनाद्वारे केली आहे.**




मंचाने इशारा दिला आहे की, सध्या कागदी स्वरूपात असलेल्या नोंदींना आग, पूर, चोरी किंवा छेडछाड यांसारख्या घटनांचा धोका कायम आहे. विशेषतः रेकॉर्ड रूममध्ये आग लागल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती घडल्यास मूळ कागदपत्रे नष्ट होऊन हजारो भूखंड व सदनिकांच्या मालकी हक्कावर गंभीर कायदेशीर संकट निर्माण होऊ शकते. अशा परिस्थितीत नागरिकांकडे मालकी सिद्ध करण्यासाठी अधिकृत नोंदीच उपलब्ध राहणार नाहीत आणि मोठ्या प्रमाणात वाद, न्यायालयीन खटले व आर्थिक नुकसान होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

सिडको मुख्यालयातून एका महत्त्वपूर्ण भूखंडाची फाईल गहाळ झाल्याची घटना नुकतीच समोर आली. राज्य माहिती आयुक्तांच्या हस्तक्षेपानंतरच याबाबत पोलिसांत तक्रार नोंदवण्यात आली. संवेदनशील विभागात बाहेरील व्यक्ती व एजंटांचा मुक्त वावर असल्याने मूळ कागदपत्रांमध्ये छेडछाड होण्याची शक्यता वाढत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### सुरक्षिततेसाठी निधी नाही?

सजग नागरिक मंचाने सवाल उपस्थित केला आहे की, सिडकोने बांधलेल्या घरांच्या विक्रीसाठी जाहिराती व प्रचारावर सुमारे ६०० कोटी रुपये खर्च करण्याची क्षमता दाखवली आहे. अशा परिस्थितीत मालकी हक्काशी संबंधित फाईल्सचे डिजिटलायझेशन करण्यासाठी निधी नसल्याचे कारण ग्राह्य धरता येणार नाही.

मंचाने सिडकोच्या रेकॉर्ड व्यवस्थापनातील त्रुटी निदर्शनास आणल्या आहेत. जसे की, अग्निरोधक व सुरक्षित रेकॉर्ड रूमचा अभाव, महत्त्वाच्या कागदपत्रांचे डिजिटल बॅकअप उपलब्ध नाही, फाईल हालचालीसाठी डिजिटल ट्रॅकिंग प्रणाली नाही, एजंटांना अधिकाऱ्यांच्या दालनात, रेकॉर्ड रूम मध्ये थेट प्रवेश, सीसीटीव्ही देखरेख व प्रवेश नियंत्रण अपुरे, मूळ कागदपत्रे हाताळण्यासाठी निश्चित नाही तसेच आग, पूर किंवा दुर्घटनेत पर्यायी बॅकअपची व्यवस्था नाही आणि माहिती अधिकारांतर्गत मागविलेल्या माहितीबाबत टाळाटाळ करणे.

मंचाने स्पष्ट केले की, रेकॉर्ड रूममध्ये आग लागल्यास संपूर्ण नोंदी नष्ट होण्याचा धोका असून त्यामुळे हजारो कोटींच्या मालमत्ता वादग्रस्त होऊ शकतात. ही केवळ प्रशासकीय त्रुटी नसून नागरिकांच्या मालकी हक्काशी संबंधित गंभीर सुरक्षा प्रश्न आहे.

मंचाने प्रशासनाला ३० दिवसांत कार्यवाही अहवाल जाहीर करण्याची मागणी केली असून, अन्यथा नागरिकांच्या मालमत्ता हक्कांच्या संरक्षणासाठी कायदेशीर व लोकशाही मार्गाने पुढील लढा उभारण्याचा इशारा दिला आहे.

# पत्रकारांना विमा, विशेष प्रशिक्षण देणार

### • वैशाख सुरेश यांची घोषणा

| चिरनेर | प्रतिनिधी |

जर्नलिस्ट अँड मीडिया असोसिएशनने महाराष्ट्र राज्यात कार्यरत पत्रकारांना २० लाखांचा विमा आणि विशेष प्रशिक्षण देणार. अशी घोषणा भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अधिपत्याखाली कार्यरत जर्नलिस्ट मीडिया असोसिएशन ग्रिव्हन्स कौन्सिलचे अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी केली. नवी मुंबईतील वाशी येथील मिनी पंजाब बँक्वेट हॉलमध्ये आयोजित या वेलकम मीट कार्यक्रमात ते बोलत होते.




या कार्यक्रमाला उपस्थित असलेले उपमहापौर दशरथ भगत यांनी माध्यम क्षेत्रातील आव्हानात्मक परिस्थितीचा उल्लेख करत जर्नलिस्ट मीडिया असोसिएशनच्या सकारात्मक उपक्रमांना यशस्वी करण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश आणि महासचिव अरुमुखम पिल्लई यांनी महाराष्ट्रात जेएमएची स्थापना आणि विस्तारासाठी कार्यरत असलेल्या स्टेट इंचार्ज सुधीर शर्मा यांच्या सकारात्मक प्रयत्नांचे कौतुक केले.

महासचिव अरुमुखम पिल्लई यांनी सांगितले की, आज प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये डिजिटल पत्रकारिता अधिक व्यापक आणि प्रभावी होत आहे; मात्र ऑनलाइन माध्यमांना प्रिंट आणि टीव्ही माध्यमांप्रमाणे कोणताही आधार किंवा सुरक्षा मिळत नाही. राष्ट्रीय अध्यक्षांनी सांगितले की, जेएमए एक सहकारी संस्था सुरू करत आहे, ज्याच्या माध्यमातून पत्रकारांना कोणत्याही अडचणीशिवाय कर्ज आणि आर्थिक मदत मिळू शकणार आहे. तसेच संघटनेशी जोडलेल्या मीडिया कर्मचाऱ्यांना अत्यल्प प्रीमियमवर २० लाखांपर्यंत अपघाती विमा मिळेल आणि दर तीन महिन्यांनी पत्रकारिता व सुरक्षेसंदर्भात विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

राष्ट्रीय अध्यक्ष वैशाख सुरेश यांनी डिजिटल आणि ऑनलाइन पत्रकारितेतील आव्हानांचा उल्लेख करत सांगितले की, जर्नलिस्ट मीडिया असोसिएशन भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने देशातील विविध राज्यांमध्ये ऑनलाइन पत्रकारांना ओळख, सुरक्षा आणि सुविधा मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. त्यांनी केवळ यूट्यूबवर बातम्या देणाऱ्यांना सावध करत सांगितले की, ही कायदेशीर पत्रकारिता मानली जात नाही, त्यामुळे डोमेन घेणे आवश्यक आहे; तेव्हाच डिजिटल पत्रकार म्हणून मान्यता मिळेल. त्यांनी सांगितले की, जेएमएजीसीच्या माध्यमातून अशा ऑनलाइन माध्यमांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## वैज्ञानिक प्रारूपनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन

**अलिबाग :** मराठी विज्ञान परिषदेतर्फे विद्यार्थ्यांसाठी (इयत्ता ६वी ते ९वी) वैज्ञानिक प्रारूपनिर्मिती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा दि. २ व ३ मे २०२६ रोजी सकाळी ११ ते ४ या वेळेत होणार आहे. या कार्यशाळेत पहिल्या दिवशी प्रकाशीय उपकरणे उदा. पिनहोल कॅमेरा, कॅलिडोस्कोप, पेरिस्कोप टेलिस्कोप विद्यार्थ्यांना स्वत: करता येईल तर दुसऱ्या दिवशी विमान कसे उडते, हे समजून घेत कागदी विमाने स्वत: तयार करता येतील. कार्यशाळेकरिता विद्यार्थ्यांना लागणारे सर्व साहित्य परिषदेतर्फे पुरविण्यात येणार आहेत. अधिक माहितीकरिता ९९६९१००९६१ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## पाण्यात बुडून आठ वर्षीय मुलाचा मृत्यू

**पालघर :** मिरारोड (पूर्व) स्थानकाबाहेर एका शॉपिंग मॉलचे बांधकाम गेल्या अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत आहे. या ठिकाणी बांधकामासाठी मोठा खड्डा खोदण्यात आला असून, त्यात पाणी साचलेले आहे. स्थानिक अंजुमन मुफीदुल यतामा शाळेत इयत्ता ३ रीमध्ये शिकणारा बिलाल सलमानी हा शनिवारी दुपारी या परिसरात खेळण्यासाठी गेला होता. दुपारी ४ वाजेपासून बिलाल बेपत्ता असल्याने कुटुंबीयांनी त्याची शोधाशोध सुरू केली. रात्र झाली तरी तो न सापडल्याने कुटुंबीयांचा संशय बळावला. अखेर रात्री १० च्या सुमारास नातेवाईकांनी त्या बंद पडलेल्या मॉलच्या आवारात जाऊन पाहिले असता, पाणी साचलेल्या खड्ड्याबाहेर बिलालचे कपडे आढळून आले. पाण्यात शोध घेतला असता बिलालचा मृतदेह हाती लागला. याप्रकरणी नयानगर पोलिसांनी सध्या अकस्मात मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप आणि शोक व्यक्त केला जात असून अर्धवट राहिलेल्या बांधकामांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून इतक्या वर्षांपासून हे धोकादायक बांधकाम उघड्यावर का आहे आणि तिथे पुरेशी तटबंदी का नाही, असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत.

# खतांचा काळाबाजार केल्यास कारवाई

| रत्नागिरी | प्रतिनिधी |

कीटकनाशक औषधे आणि कृषी बियाणे विक्रेत्यांनी कोणत्याही परिस्थितीत जास्त दराने किंवा निकृष्ट दर्जाच्या वस्तूंची विक्री करू नये. रासायनिक खत विक्रेत्यांनी कोणत्याही खतांची साठवणूक, काळाबाजार व जादा दराने विक्री करू नये. तसे केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधितांवर कायद्यानुसार कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा रत्नागिरी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शिवकुमार सदाफुले यांनी दिला आहे.




कृषी हंगामादरम्यान कोणतीही टंचाई भासू नये, यासाठी प्रशासनाकडून काटेकोर नियोजन करण्यात आले असून, शेतकऱ्यांनी माती परीक्षणाच्या आधारेच खतांचा वापर करावा.जिल्ह्यातील खतांची मागणी लक्षात घेऊन आवश्यक प्रमाणात खते उपलब्ध करण्यात आली आहेत. यामध्ये युरिया, डीएपी, एनपीके, एसएसपी व संयुक्त खतांचा समावेश असून, मागील वर्षांच्या सरासरी वापराचा विचार करून यंदा साठा उपलब्ध करण्यात येणार आहे. आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळामार्फत पुरेसा साठा राखून ठेवण्यात येणार आहे, असे कृषी अधिकारी सदाफुले यांनी सांगितले.

# महात्मा बसवेश्वरांची जयंती साजरी

| रोहा | प्रतिनिधी |

जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात महान कार्य केले आहे. त्यांचे विचार जगभर पसरले आहे. अशा महान संत जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांचे विचार प्रत्येकाने आचरणात आणण्याची आवश्यकता असल्याचे पंचक्रोशी जंगम समाज अध्यक्ष लक्ष्मणस्वामी जंगम यांनी सांगितले. राजेंद्रस्वामी जंगम यांच्या निवासस्थानी आयोजित जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती निमित्ताने मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी महात्मा बसेश्वर यांचे जीवन चरित्र वाचून दाखवले. तसेच, कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेट पंचक्रोशी जंगम समाज यांनी गेल्या वर्षभरात विद्यार्थ्यांचा गुणगौरव, नारीशक्तीचा कार्यक्रम, मन्मथ स्वामी जयंती, आयटी अंतर्गत विद्यार्थ्यांचा प्रवेश यासह राबवीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला दीप प्रज्वलन, जगतज्योती महात्मा बसवेश्वर, जगद्गुरु रेणुकाचार्य व मन्मथ माऊली यांच्या तस्वीरेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केले. यावेळी उपस्थित पंचक्रोशीतील माहेश्वर समाज बांधवांनी शिवपाठ घेतले.

# चित्रकला स्पर्धा, लाठीकाठी शिबीर

| सुकेळी | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील बाळसई येथे अक्षय तृतियाचा मुहूर्त साधत रविवारी (दि.१९) सायंकाळी ४.३० वाजता विठ्ठल रखुमाई मंदिरात चित्रकला स्पर्धा तसेच लाठीकाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या दोन्ही कार्यक्रमाला बाळसई ग्रामस्थांचा व लहान मुलांसह महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमामध्ये एकूण ३३ जणांनी सहभाग दर्शविला. यामध्ये १० पुरुष, २ महिला, तसेच २१ लहान मुले सहभागी झाले होते. यामध्ये अनेक लहान मुलांनी वेगवेगळ्या प्रकारची चित्रे काढली होती. तसेच लाठीकाठीचे देखील प्रात्यक्षिक दाखवून सर्वांचीच मने जिंकली.



यावेळी या कार्यक्रमामध्ये सहभागी झालेल्या सर्वांनाच प्रमाणपत्र व भैटवस्तू देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बाळसई गावचे उपाध्यक्ष वसंत भोसले, ग्रामस्थ दयाराम नावले, रामचंद्र तेलंगे, तुळशिराम कोकाटे, मनोज भोसले, देवेंद्र पाटेकर, बबन तेलंगे, संत साहित्य प्राज्ञ गीता प्रवर्तक वैष्णवी मोरे, दुर्गा वहिनी संयोजिका रायगड जिल्हा (शिव व्याख्यानकार), कल्पेश साळवी (लाठी काठी मार्गदर्शक), गणेश राणे (जिंदल संकुल चित्रकला मार्गदर्शक, किशोर पाटेकर आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

या कार्यक्रमामध्ये उपस्थित सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शावर चालण्याचा संकल्प केला व समजात एकता व संस्कार जोपासण्याचा संदेश देण्यात आला.

खरीप हंगामाची आढावा बैठक | शासन व कृषी विभाग ॲक्टिव्ह मोडवर

# १४५.२० लाख हेक्टर पेरणीचे नियोजन

| पुणे | प्रतिनिधी |

खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये सुमारे १४५.२० लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन, भात, मका, तूर, उडीद, कापूस व ऊस या प्रमुख पिकांच्या पेरणीचा लक्षांक निश्चित करण्यात आला आहे. तसेच, भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार यंदा पर्जन्यमान हे दीर्घकालीन सरासरीच्या ९२ टक्के इतके राहण्याची शक्यता असून, ‘एल निनो’ स्थितीमुळे पावसात अनियमितता तसेच काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याचे काम महाराष्ट्र शासन व कृषी विभागामार्फत सुरू असल्याची




माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

शिवाजीनगर, बालचित्रवाणी शेजारील नव्याने बांधण्यात आलेल्या सारथीच्या सभागृहात खरीप हंगाम २०२६ च्या नियोजनासंदर्भात कार्यशाळा पार पडली. कार्यशाळेनंतर कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी बोलताना ते म्हणाले, मुख्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना घोषित केली असून ३० जुनच्या आत शेतकऱ्यांची कर्जमाफी होणार आहे. या कर्जमाफीसंदर्भातील शेतकऱ्यांची माहिती गोळा करण्याचे व निकष ठरवण्याचे काम अंतिम टप्प्यावर आहे.

पुढे बोलताना कृषी मंत्री भरणे म्हणाले, आगामी खरीप हंगाम २०२६ च्या अनुषंगाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेत खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या पूर्वतयारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. येत्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना खते व बियाणे वेळेत आणि पुरेशा प्रमाणात उपलब्ध व्हावेत, यासाठी आवश्यक त्या सुचना विभागास दिल्या आहेत. यंदा एल निनोच्या पार्श्वभूमीवर हवामानाचा अंदाज वर्तवण्यात आला असून त्याचा शेती क्षेत्रावर होणारा संभाव्य परिणाम, पर्जन्यमानाची स्थिती आणि त्यानुसार पीक नियोजनाबाबतही कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले.

‘एल निनो’ च्या पार्श्वभूमीवर कृषी विभागातर्फे राज्यात हवामान प्रतिरोधक बियाण्यांचा वापर, उताराला आडवी पेरणी, बीबीएफ तंत्राचा अवलंब, शेततळ्यांची निर्मिती, मल्चिंग व सेंद्रिय खतांचा वापर तसेच पाणी बचत करणाऱ्या सिंचन पद्धतींवर विशेष भर दिला जाणार आहे. याकरिता महाकृषी ॲपच्या माध्यमातून हवामानास अनुकूल कृषी तंत्रज्ञानाची प्रात्यक्षिके कृषी विभागामार्फत घेणे सुरु आहे. तसेच महाविस्तार ॲप, कृषी विभागाचे यु ट्यूब, फेसबुक, एक्स, इन्स्टाग्राम, व्हाट्सॲप चॅनेल या सोशल मिडियाच्या माध्यमातूनही हवामान अनुकूल तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार करणे सुरु आहे.

## निवडक

### बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

**ठाणे :** कसाराजवळील कळभोंडे लाद्याची वाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात ८ वर्षीय बालकाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. कृष्णा भागा आगीवले असे मृत बालकाचे नाव आहे. झाडावरील आंबे व करवंदे गोळा करीत असताना जंगलात दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक कृष्णावर झडप घातली. या झटापटीत फरपटत नेलेल्या कृष्णाचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. कृष्णा आगीवले हा मंगळवारी (दि.२१) सकाळी ८ वाजण्याच्या सुमारास घराजवळील रानात रानमेवा गोळा करीत होता. यादरम्यान दडून बसलेल्या बिबट्याने त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत झाला. या घटनेची माहिती स्थानिक गावकऱ्यांना मिळताच गावकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर घटनास्थळी गर्दी केली. तथापि या घटनेनंतर वन विभागाच्या कार्यपद्धतीवर ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. परिसरात बिबट्याचा वावर अनेक दिवसांपासून दिसत असल्याची माहिती स्थानिकांनी वन विभागाला दिली होती. मात्र कोणतीही ठोस प्रतिबंधात्मक उपाययोजना न केल्याने अखेर एका निष्पाप बालकाचा बळी गेल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.






### नशामुक्त मुंबईसाठी ड्रग्जविरोधी मोहीम

**मुंबई :** मुंबईला पडलेला अमली पदार्थांचा विळखा सोडवण्यासाठी आणि युवा पिढीमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी १ मे महाराष्ट्र दिनापासून नशामुक्त मुंबईसाठी ‘मुंबई अगेन्स्ट ड्रग्ज’ मोहीम राबवण्यात येणार आहे. मुंबईतील गोरेगाव येथील नेस्को सेंटरमध्ये आयोजित एका म्युझिक कॉन्सर्टदरम्यान अमली पदार्थांच्या (ड्रग्ज) अतिसेवनामुळे दोन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या वतीने वांद्रे येथील उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावण्यात आली होती. या बैठकीला उपनगरचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार अमित साटम यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते. यासंदर्भात एक कमिटी स्थापन करण्यात येणार आहे. नशामुक्ती क्षेत्रात कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी या कमिटीचे अध्यक्ष नियुक्त करण्यात येतील. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन १ मे २०२६ ते १ मे २०२७ या कालावधीत मुंबई अगेन्स्ट ड्रग्ज’ ही मोहीम वर्षभर राबवणार असल्याचे मंगल प्रभात लोढा यांनी सांगितले.

### देवरुखमध्ये भटक्या कुत्र्यांचा धुमाकूळ

**रत्नागिरी :** देवरुख शहरात भटक्या कुत्र्यांचा त्रास दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांना त्याचा मोठा फटका बसत आहे. शनिवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास देवरुख बाजारपेठेत भटक्या कुत्र्याने अक्षरशः धुमाकूळ घातला. बसस्थानक परिसरात नेहमी वावरत असलेल्या कुत्र्यांच्या समूहातील एका कुत्र्याने अचानक आक्रमक होत एकाच वेळी तिघा नागरिकांवर हल्ला करून त्यांना चावे घेत जखमी केले. या अचानक झालेल्या हल्ल्यामुळे बाजारपेठेत एकच खळबळ उडाली असून, परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. जखमी झालेल्या तिघांनी तात्काळ देवरुख येथील सरकारी रुग्णालयात धाव घेत उपचार घेतले. डॉक्टरांनी त्यांना महिनाभर आवश्यक उपचार व लसीकरण घेण्याचा सल्ला दिला आहे. दरम्यान, शहरात वाढलेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात असून नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या समस्येवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### हुंड्यासाठी विवाहितेवर अत्याचार

**पालघर :** नालासोपारा पूर्वेला राहणाऱ्या एका विवाहित महिलेला सासरच्यांनी बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या मारहाणीचा संपूर्ण प्रकार इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, संबंधित महिलेला होत असलेल्या अमानुष छळाचे धक्कादायक दृश्य समोर आले आहे. स्वप्नाली सिंग असे पीडित महिलेचे नाव असून, त्या आपल्या पती आणि लहान मुलीसह त्याच इमारतीतील वेगळ्या फ्लॅटमध्ये वास्तव्यास आहेत. त्या व्यवसायाने शिक्षिका असून घरातच मुलांची शिकवणी घेतात. पीडित महिलेच्या तक्रारीनुसार, सासू, सासरे, दोन नणंद, दीर तसेच नणंदेचे पती अशा कुटुंबीयांकडून गेल्या १३ वर्षांपासून हुंड्याच्या पैशांसाठी सातत्याने छळ करण्यात येत आहे. वारंवार मानसिक व शारीरिक त्रास देत मारहाण केली जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. दरम्यान, या प्रकरणातील मारहाणीचा व्हिडिओ समोर आल्यानंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे. मात्र, सासरच्या मंडळींनी आरोप फेटाळले असून पोलिसांनी या प्रकरणात नेमकी काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### तळा महाविद्यालयात ऑनलाइन वेबिनार

**तळा :** तळा विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयात डेलनेट रिसोर्सेस ॲन्ड सर्व्हिस या विषयावर नुकतेच ऑनलाईन वेबिनार पार पडले. हा कार्यक्रम आयक्यूएसी व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या वेबिनारसाठी डेलनेट पुणे येथील सिनियर नेटवर्क असिस्टंट रोहिदास राठोड यांनी मार्गदर्शन करत डेलनेटच्या विविध सेवा, ई-जर्नल्स, ई-बुक्स, इंटर लायब्ररी लोन व डिजिटल डेटाबेसचा प्रभावी वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे पोर्टलचा वापरही दाखवून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. भरत चाळके यांनी केले, तर प्रस्तावना व परिचय ग्रंथपाल मनोज वाढवळ यांनी करून दिला. प्राचार्य डॉ. यादव एन. एस. यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत डिजिटल ग्रंथालय सेवांचे महत्त्व अधोरेखित केले. शेवटी प्रा. विजय चव्हाण यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या वेबिनारला प्राध्यापक, विद्यार्थी व ग्रंथालय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक



### सावतामाळीतर्फे डोळे तपासणी मशीन भेट

**अलिबाग :** समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून नेहमीचं पुढाकार घेणाऱ्या सावतामाळी नागरी सहकारी पतसंस्थेने एक स्तुत्य पाऊल उचलत लायन हेल्थ फाऊंडेशन, अलिबाग यांना लहान मुलांमधील तिरळेपणा (भेंगडेपणा) कमी करण्यासाठी उपयुक्त असलेले विशेष मशीन भेट दिली आहे. या मशीनच्या सहाय्याने डोळ्यांच्या तिरळेपणावर योग्य वेळी उपचार करता येणार असून अनेक लहान मुलांना याचा मोठा फायदा होणार आहे. ग्रामीण व परिसरातील पालकांसाठी ही सुविधा अत्यंत उपयुक्त ठरणार असून, अलिबाग व आसपासच्या भागातील रुग्णांना आता अत्याधुनिक उपचार सहज उपलब्ध होणार आहेत. सदरील मशीनचे उदघाट्न सावतामाळी पतसंस्थेचे अध्यक्ष रमेश नाईक, यांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी उपाध्यक्ष जगदीश कवळे व पदाधिकारी, लायन हेल्थ फाऊंडेशनचे डॉक्टर व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली. समाजाच्या आरोग्यविषयक गरजांकडे लक्ष देत केलेल्या या उपक्रमामुळे सावतामाळी नागरी सहकारी पतसंस्था पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपणारी संस्था म्हणून समोर आली आहे. याशिवाय श्री क्षेत्र विठोबा देवस्थान वरसोली यांच्यावतीने डोळे तपासणी मशीन भेट म्हणून दिली आहे.



### मुनवली येथे विकासकामांचे भूमीपूजन

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे गावातील अंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा ग्रामपंचायतीच्या विशेष फंडातून सिमेंटचे ठोकले बसवणे व मुनवली क्रिकेट मैदानावर आसनव्यवस्था बांधणे या कामांचे रविवारी (दि.१९) एप्रिल रोजी मापगाव माजी सरपंच सुनिल थळे यांच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी केशव चांदोरकर, समद कुर, लाईक कप्तान, किशोर सातमकर, सानिका घाडी, दिलीप मोंढे, संतोष बांद्रे, संजय अनमाने, अजित हरवडे सर, संदेश पाटील, गंगाराम ठकरुळ, सुधाकर मल्हार, सुरेश हाके, सतीश घाडी, अक्षय जाधव, विजय सोनावणे, मधुकर सूद, रुपेश अनमाने, सुरेश हाके, अमोल हाके, संदेश पाटील, दयाराम म्हात्रे, किसन सलग, समिर ठकरूळ, अहिल्या अनमाने, मुनावर कुर, सुलचोना मोंढे, निर्मला पंडम, सचिन घाडी तसेच सोगाव, मुनवली तसेच मापगाव पंचक्रोशीतील महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिलार धरणाला स्थानिक शेतकऱ्यांचा विरोध

**नेरळ :** कर्जत तालुक्यातील चिल्लार नदीवर उभारण्यात येत असलेल्या शिलार धरणाला स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. या धरणाचे नाव या भागातून कायमस्वरुपी पुसटून टाकायचे आहे असा निर्धार शिलार धरण संघर्ष समितीने बैठकीत घेतला. पिंगळस येथे प्रस्तावित शिलार धरण प्रकल्पग्रस्तांची बैठका झाली. त्यावेळी हा निर्धार करण्यात आला होता. शिलार धरण हद्दपार करण्यासाठी संघर्ष समितीची स्थापन करून पुढील नियोजन करण्यात आले. पिंगळस येथे आयोजित बैठकीत संघर्ष समितीचे दिनेश माधव रसाळ, ॲड. भाऊसाहेब मोरे, ॲड. प्रदीप भोईर, काशिनाथ रसाळ, ॲड. सुदाम धूळे, रवींद्र गोमारे, गणेश रसाळ,छगन सावंत, मंगेश सावंत, कुशल कवठे, संतोश कदम तसेच खांदन, शिलार, शिलारवाडी, धोत्रे आदी परिसरातील गावांमधील २५० ग्रामस्थ उपस्थित होते.प्रकल्प ग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष दिनेश रसाळ यांनी आपल्या कर्जत तालुक्यात अनेक प्रकल्प लादले जात आहेत. त्यातच विद्युत प्रकल्प टोरेंट, पोशीर धरण, तसेच शिलात धरण असे अनेक प्रकल्प कर्जतकरांच्या माथी मारण्याचे काम सरकार करत आहे. अगोदरच कोंडाणा धरण अपूर्णस्थितीत आहेत ते पूर्ण करावे. ते न करता नवीन धरण बांधण्याचा घाट घातला कशासाठी? असा सवाल करीत या धरणाला विरोध करण्यासाठी शिलार धरण भूमिपुत्र शेतकरी संघर्ष समितीच्या अध्यक्षपदी दिनेश माधव रसाळ यांची उपस्थित शेतकऱ्यांना केला. भविष्य काळात धरणाला हटवण्यासाठी सर्वांना एकत्र घेऊन आंदोलने आणि उपोषण करणार असल्याचे यावेळी जाहीर केले.


## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **बिल्डींग मटेरियल शॉप मध्ये** अनुभवी सुपरवायजर हवा आहे. पेमेंट : २१०००-२५०००, संपर्क - ८००७८९३२३२
- **कामासाठी माणसे/मुलगे पाहिजे.** १) कंपनीचे मोबाईल विक्रीसाठी दुकानदारांकडे उरण, उलवा/महाड-माणगाव, पेण-पोयनाड २) डिलेवरी एस.टी. ने अथवा बाईकने (पेण-अलिबाग) (रेवदंडा-मुरूड-अलिबाग) लायसन्स पाहिजे. (बाईक आमची) ३) कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे. ४) पार्ट/फुल टाईम चालेल. (संपर्क : ८८८८२२०२२१)
- **वधू पाहिजे-** वय- ५० वर्ष, निमगोरी, शिक्षण- ग्रज्युवेशन, जात-हिंदु, फोन नं. - ७३८५६६४०७९.
- **नागाव ४, सहाण ३ गुंठे** कमर्शियल बांधकाम केलेली भाडेतत्वावर देणे आहे. मो. ९३२४०६६१११
- **नागाव येथे राहून कामासाठी कपलची आवश्यकता** कामाचे स्वरूप : जेवण बनवणे, घरकाम करणे, तसेच गार्डन व स्विमिंग पूलची देखभाल करणे. सुविधा : राहण्यासाठी स्वतंत्र केअरटेकर रूम उपलब्ध. पगार : रू. २५,०००/- प्रति महिना संपर्क : ७५५९१८४६१२
- **३५ गुंठे शेतजमीन विकणे आहे.** मौजे कावीर- गरूडपाडा, बोअरवेल आणि इलेक्ट्रिक मीटर आहे. आतील रस्त्याला लागून. संपर्क : ९८६७५३०७२७

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


# अनधिकृत बांधकामांचा सुळसुळाट

**■ श्रीवर्धन नगरपरिषदेच्या भूमिकेकडे लक्ष ■ जास्त बांधकाम करण्यांच्या घटनांत वाढ**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन नगरपरिषद हद्दीत अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाची संख्या वाढती असून या बाबतीत आता नगरपरिषद अक्शन मोड वर येणार की अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणाला अभय देणार याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले झाले आहे. नगराध्यक्ष ॲड. अतुल चौगुले आता या बाबतीत काय निर्णय घेणार याची उत्सुकता वाढली आहे.

स्वतः मालकीची हद्द सोडत सार्वजनिक रस्त्यावर अतिक्रमण करून नाले, गटारावर सर्रास सिमेंट काँक्रिटीकरणचे बांधकाम करत व्यवसायाकरीता जागा वापरणे तसेच रस्त्यालगत अनधिकृत व्यापारी गाळे उभारण्याच्या संख्येत गेल्या काही वर्षांत लक्षणीय वाढ झाली आहे. इमारत अथवा घराचे बांधकाम करताना नगर परिषदेकडून नकाशा मंजूर न करून घेता किंवा बांधकाम परवाना न घेता केलेले बांधकाम करण्यात येणे, नगरपरिषदेने दिलेल्या परवानगीपेक्षा किंवा मंजूर चटईक्षेत्र निर्देशांकापेक्षा जास्त बांधकाम करणे, अशा घटनांत गेल्या दहा ते पंधरा वर्षांत वाढ झाली आहे.



निवासी संकुले, दोन मजली रिसॉर्ट, इमारत बांधकाम पूर्ण झाल्यावर ते मंजूर नकाशाप्रमाणेच झाले आहे, याची खात्री पटल्यावर नगर परिषदेकडून भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येते. त्यानंतरच इमारतीत राहणे कायदेशीर ग्राह्य धरले जाते. जागेच्या स्थितीनुसार पर्यावरण विभागाचा दाखला गरज भासल्यास अग्निशमन दल नाहरकत प्रमाणपत्र इत्यादींची आवश्यकता भासू शकते. सद्यस्थितीत उभारण्यात आलेल्या इमारतींबाबत सर्व प्रमाणपत्रे आहेत की हा संशोधनाचा विषय आहे.

### धनदांडग्यांना वरदहस्त कोणाचा ?

शहरातील एका धनदांडग्या व्यक्तीने नगर परिषदेची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता वाडीत सेंट्रिंग व प्रबलित सिमेंट काँक्रीटचे (आरसीसी) अनधिकृत जोते (पाया) उभारत बांधकाम सुरू केले होते. नगरपरिषदेकडून वारंवार नोटीस बजावूनही काही प्रतिसाद न मिळाल्याने नगर परिषदेने जेसीबीच्या सहाय्याने अनधिकृतपणे उभे करण्यात आलेले सेंट्रींग आणि जोते पूर्णपणे जमीनदोस्त केले होते. नगरपरिषदेच्या नोटीसला धुडकवणाऱ्या धनदांडग्याला कोणाचा वरदहस्त होता. याची चर्चा नागरिकांत सुरू होती.

> **“श्रीवर्धन नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये ज्यांनी अतिक्रमित बांधकामे केलेली आहेत किंवा अनधिकृत बांधकामे केलेली आहेत अशा बांधकामांची सखोल चौकशी केली जाईल व संबंधितांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. प्रचलित कायद्यांच्या विरुद्ध जाणाऱ्यांची कोणतीही हयगय केली जाणार नाही.”**
> **-ॲड. अतुल चौगुले**
> **नगराध्यक्ष श्रीवर्धन नगरपरिषद.**

## समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारत सरकारच्या कौशल्य व उद्योजकता विकास मंत्रालयाची योजना जन शिक्षण संस्थान रायगड व टिळक महाराष्ट्र विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवारी (दि.२०) एप्रिल रोजी (C.C.S.W) सर्टिफिकेट कोर्स इन सोशल वर्क हा ६ महिने कालावधीचा समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे उद्‌घाटन करण्यात आले. १० वी पास व त्या पुढील कोणत्याही शाखेतील शैक्षणिक पात्रता असणाऱ्या समाजातील प्रत्येक स्तरातील प्रशिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना अत्यल्प प्रशिक्षण शुल्कात एक रक्कमी फी भरून ॲडमिशन घेणे सोपे जाणार आहे असल्याचे मत संचालक डॉ. विजय कोकणे यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.



सदर व्यवसाय प्रशिक्षण वर्गात समाजकार्य संकल्पना, सामाजिक संरचना, सामाजिक समस्या, गट कार्य, व्यक्ती सहाय्यक कार्य, शासकीय योजना, सामाजिक संस्थांच्या भूमिका, संप्रेषण कौशल्य, नेतृत्व कौशल्य, क्षेत्र कार्य, वैयक्तिक कार्य अशा अनेक समाज उपयोगी तंत्र व कौशल्यांचा अभ्यास सदर समाजकार्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम विषयात विद्यार्थ्यांना करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

जन शिक्षण संस्थान रायगडच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. मेधा किरीट सोमैया, डॉ. नितीन गांधी, विजय हिरामण कोकणे, रत्नप्रभा बेल्हेकर व्यवस्थापक मंडळ, त्याचबरोबर टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या उपाध्यक्ष डॉ. प्रणती टिळक, अभिजीत खाडीलकर, डॉ. गीता जोशी, स्मिता वारघडे यांच्या विशेष मार्गदर्शनातून सदर प्रेरणादायी उपक्रम वाडी, वस्त्या, ग्रामीण, शहरी, व दुर्गम आदिवासी भागातील लाभर्त्यांचा शैक्षणिक दर्जा उंचविण्याच्या व त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या दृष्टिकोनातून सदर उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

कार्यक्रमाप्रसंगी डॉ. पूजा भालेराव, सौरभ आंबीलपुरे, प्रज्ञा अग्रवाल, आरती पांडे जी, नरेन जाधव, सी व्ही. पाटील, रायगड जिल्हा कौशल्य विकास प्रतिनिधी नेताजी व मोसिन वस्ता आदी उपस्थित होते.

## ‘निवृत्त शिक्षकांच्या समस्या दूर करा’

**। उरण । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील वयोवृद्ध सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांच्या वरिष्ठ श्रेणी निवड श्रेणीपासून मिळणाऱ्या आर्थिक लाभाचे प्रश्न प्रलंबित ठेवून अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या मनमानी कारभाराला निवृत्त शिक्षक कंटाळले आहेत. ज्या शिक्षकांना आर्थिक लाभ मिळणार आहे. त्यांचे निधन झाले आहे. प्रशासनातील अधिकारी त्यांच्याकडून तक्रार अर्ज मागतात ते देणार कसे? असा प्रश्न निवृत्त शिक्षक संघाकडे समोर आला आहे. १९८६ च्या प्रा. चट्टोपाध्याय वेतन आयोगानी वरिष्ठ श्रेणी निवड श्रेणी मंजूर करण्यासाठी २ सप्टेंबर १९८९ रोजी पारीत केलेल्या शासन निर्णयात स्पष्ट मार्गदर्शन दिलेले आहे. त्याचा अभ्यास न केल्यामुळे अनेक निवृत्त शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी मंजूर केली नाही. परिणामी संबंधीत निवृत्त शिक्षकांना निवड श्रेणी मंजूर करता येत नाही, असे निवृत्त शिक्षक आज या जगात नाहीत. तसेच त्यांचे वारसदार हयात नाहीत. अशा परिस्थितीत त्यांचे तक्रार अर्ज करणार कोण? हताश झालेल्या सेवानिवृत्त शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी उरण पंचायत समितीचे सभापती महेश म्हात्रे यांची त्यांच्या दालनात भेट घेऊन एका निवेदनाद्वारे निवृत्त शिक्षकांच्या समस्या दूर करा असे साकडं घातले आहे.

## कर्जत तालुक्यात दोन जागांसाठी पोटनिवडणूक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात चार ग्रामपंचायतीमध्ये रिक्त असलेल्या सहा जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या पोटनिवडणुकीसाठी २८ एप्रिल रोजी मतदान होणार असून चार जागा बिनविरोध झाल्याने अवघ्या दोन जागांसाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे.

तालुक्यातील पालीतर्फे कोतवाल खल्लाटी, दहिवलीतर्फे वरेडी, गौरकामत आंभेरपाडा, या चार ग्रामपंचायतीमधील सहा जागा रिक्त झाल्या होत्या. त्या रिक्त जागांसाठी पोटनिवडणूक जाहीर झाली आहे. या पोट नामांकन अर्ज दाखल करण्याचे मुदतीत चार जागांवर केवळ एक नामांकन अर्ज दाखल झाल्याने अर्ज माघार घेण्याच्या मुदतीनंतर एकमेव अर्ज कायम राहिले.त्यामुळे दहिवलीतर्फे वरेडी, अंभेरपाडा, गौरकमत आणि पालीतर्फे कोतवाल खल्लाटी या चार ग्रामपंचायतीमधील प्रत्येकी एक जागा बिनविरोध झाली. आंभेरपाडामध्ये गोराबाई सुनील काठे या अनुसूचित जमाती महिला राखीव जागेवर तर शिवाजी मिसाळ हे दहिवलीतर्फे वरेडीमध्ये नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला राखीव जागेवर बिनविरोध निवडून आले. तर गौरकामतमध्ये सुमन वाघमारे या अनुसूचित जमाती महिला राखीव जागेवर आणि दीक्षा देशमुख या पालीतर्फे कोतवाल खल्लाटी या ग्रामपंचायतीमध्ये सर्वसाधारण महिला जागेसाठी झालेल्या पोटनिवडणुकीत बिनविरोध निवडून आले. मात्र, पालीतर्फे कोतवाल खल्लाटी आणि गौरकामत येथील एका जागेसाठी एकाहून अधिक उमेदवार रिंगणात असल्याने निवडणूक होत आहे. पालीतर्फे कोतवाल खल्लाटीमधील एका सर्वसाधारण जागेसाठी आशिष देशमुख आणि मयूर देशमुख यांच्यात सरळ लढत होणार आहे. तर गौरकामत ग्रामपंचायतीमधील एका जागेसाठी होत असलेल्या पोट निवडणुकीत सर्वसाधारण महिला जागेसाठी स्नेहा देशमुख आणि श्रुती दळवी यांच्यात सरळ लढत होत आहे.

## वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे रुग्णांना दिलासा

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील दोन लाख लोकसंख्येसाठी येथील शासकीय इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय व कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र एकमेव आधार आहे. उरणच्या पूर्व भागातील सुमारे एक लाख गोरगरीब नागरिक उपचारासाठी कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्राकडे धाव घेतात. या केंद्रासाठी वैद्यकीय अधिकारी ३, महिला आरोग्य परिचारिका २,आरोग्य सेविका २६, शिपाई २ आदी ३३ पदे मंजूर आहेत. यामध्ये आवश्यकता असलेल्या तीन सुरक्षारक्षकांचा समावेश नाही. यापैकी वैद्यकीय अधिकारी २, महिला आरोग्य परिचारिका १, आरोग्य सेविका २२, शिपाई २ अशी तब्बल २७ पदे रिक्त होती. अवघ्या तीन आरोग्य सेविकांवर गर्भवती, बाळंतीण महिला, नवजात बालकांची तपासणी आणि इतर कामांचा भार आला होता. याबाबत आवाज उठविताच कोप्रोली प्राथमिक आरोग्य केंद्रच्या बाबतीत आरोग्य विभागाने लगेच सूत्र हलविले.

आरोग्य विभागाने समस्याची त्वरित दखल घेऊन दोन महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक केली. जिल्हा आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी डॉ. कोमल डकेवाड व डॉ. मानसी वावेकर यांची नियुक्ती केली असल्याची माहिती उरण पंचायत समितीचे तालुका आरोग्य अधिकारी वंदन कुमार यांनी दिली. वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्यांमुळे ग्रामीण भागातील रुग्णांना आता दिलासा मिळाला आहे. तरी इतर रिक्त पदेही त्वरित भरण्यात यावी व जनतेला चांगल्या सेवा सुविधा द्याव्यात अशी मागणी जनतेने केली आहे.

### संपामुळे नागरिकांचे हाल

**आगरदांडा :** प्रलंबित मागण्यांसाठी मुरूड तहसीलदार कार्यालयातील सर्व कर्मचारी बेमुदत संपावर गेल्यामुळे येणाऱ्या नागरिकांचे व शालेय विद्यार्थ्यांचे कोणतीच कामे होत नसल्याने नागरिकांनी नाराजी दर्शवली आहे. कामांकरिता तहसीलदार कार्यालयात सातबारा, उत्पन्न दाखला, जातीचे प्रमाणपत्र, फेरफार, दाखले, शैक्षणिक दाखले, विविध दाखले घेण्यासाठी येत असतात.परंतु संपामुळे महसुली कामे बंद असल्याने नागरिकांचे हाल झाले.

## रविंद्र कर्वे यांना ‘दधिची’ पुरस्कार जाहीर

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दि एज्युकेशन सोसायटीतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा ‘दधिची’ पुरस्कार सेवा सहयोग फाऊंडेशनच्या विद्यार्थी विकास योजनेचे प्रणेते रविंद्र कर्वे यांना जाहीर झाला आहे. तसेच औद्योगिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी शिरीष बेंडाळे यांना ‘अंबरनाथ भूषण’ शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. अरविंद कुलकर्णी यांना ‘आचार्योत्तम’ पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



या पुरस्कारांचे वितरण शनिवार दि.२५ एप्रिल रोजी अंबरनाथ (प) येथील महात्मा गांधी विद्यालयाच्या सभागृहात आयोजित समारंभात होणार आहे. डॉ. अच्युत गोडबोले यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

### ‘पसंतीच्या क्रमांकासाठी अर्ज सादर करा’

**नवीन पनवेल :** प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे दुचाकी वाहनांसाठी एम एच ४६ डीएच ही नवीन मालिका सुरु करण्यात येणार आहे. ज्यांना दुचाकी वाहनांकरिता आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहित शुल्क भरुन २३ एप्रिल रोजी कार्यालयीन वेळे दरम्यान विहित नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या खासगी वाहन विभागात डीडी, निवासी पत्त्याचा पुरावा, ओळखपत्राच्या साक्षांकित प्रतीसह जमा करण्याचे आवाहन केले आहे.

**परिसरातील वनसंपदेचे होणार संरक्षण | स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी**

# श्रीवर्धनमध्ये जैवविविधतेची जनजागृती

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन येथील समुद्र किनाऱ्यावर होत असलेल्या वन पर्यटन प्रकल्पामुळे किनाऱ्यावर पर्यावरणपूरक पर्यटनाला चालना मिळणार आहे. यामुळे परिसरातील वनसंपदेचे संरक्षण होईल व पर्यटकांना निसर्गाच्या सान्निध्यात शांततापूर्ण अनुभव घेता येणार आहे. स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करुन देणारा आणि भारताच्या पर्यटन नकाशावर श्रीवर्धन शहराला विशेष स्थान मिळवून देणारा वन पर्यटन हा महत्त्वपूर्ण प्रकल्प ठरणार आहे.




श्रीवर्धन समुद्र किनाऱ्याला ब्लू फ्लॅग बीच पायलट मानांकन प्रायोगिक तत्त्वावर प्राप्त झाल्यानंतर सदर मानांकन कायमस्वरूपी मिळण्याकरिता करावयाच्या उपाययोजनांच्या पार्श्वभूमी वर श्रीवर्धन निसर्ग पर्यटन ही संकल्पना समोर आली आहे. समुद्रकिनाऱ्यास लगत वनविभागाच्या सर्वे नंबर तीनशे साठमधील जमिनीवर स्वच्छता व सौंदर्यीकरण करण्याच्या अनुषंगाने तसेच येणाऱ्या पर्यटकांसाठी निसर्ग व जैवविविधते बाबत जनजागृती करण्यासाठी वन पर्यटन प्रकल्प हाती घेण्यात आला. सौंदर्यकरणांतर्गत कमान, सेल्फी पॉइंट, माहिती फलकाचे नियोजन आहे.

या वन पर्यटन मुळे श्रीवर्धन शहराचे समुद्री वादळ वाऱ्यापासून बचाव करण्यासाठी एकप्रकारे कवच असलेल्या किनाऱ्यावरील सुरू रोपवन दीर्घकाळासाठी अबाधित ठेवण्यास मदत होणार आहे. भविष्यात श्रीवर्धन येथे वन्यजीव संवर्धन, पक्षी निरीक्षण, समुद्री जैवविविधता संबंधित पर्यटन आणि जनजागृती वाढविण्याच्या अनुषंगाने विशेष प्रयत्न करण्याचे उद्दिष्ट आहे. सदर प्रकल्प उपवनसंरक्षक रोहा शैलेंद्रकुमार जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन वनविभाग वनपरिक्षेत्र अधिकारी स्वप्नील चंबुले व टीम मार्फत आकार घेत आहे.

> **“जागतिक स्तरावरील ‘ब्ल्यू फ्लॅग’ मानांकनाच्या धर्तीवर या समुद्रकिनाऱ्याचा कायापालट करण्यात येत आहे. पर्यटकांना जागतिक दर्जाच्या सुविधा मिळाव्यात, स्थानिकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध व्हाव्यात आणि श्रीवर्धनचे पर्यटन जागतिक नकाशावर झळकावे या दृष्टीने ही कामे प्रगतीपथावर सुरू आहेत. श्रीवर्धनचा पर्यटन वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी आणि येथील निसर्गसौंदर्य पर्यटकांपर्यंत अधिक सक्षमपणे पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”**
> **-आदिती तटकरे**
> **महिला व बालविकास मंत्री**

विनायक दळवी

# यंदाचे आयपीएल वर्ष बहुदा पंजाबचे!

कोणत्याही खेळात विजयाची भट्टी जमून येणं अतिशय महत्त्वाचा असते.आयपीएल स्पर्धा गेले कित्येक वर्षे आपण पाहतोय. विश्वविख्यात किंवा जागतिक विक्रमवीर संघात असणाऱ्या आरसीबी सारख्या संघाला विजेतेपदासाठी तब्बल १८ वर्ष वाट पाहावी लागली. त्याच वेळी पहिल्याच आयपीएलला राजस्थान रॉयल सारखा, फारसे प्रसिद्ध खेळाडू संघात नसलेला संघ, विजेता ठरला होता. कप्तान वॉर्नने नवोदित खेळाडूंना हाताशी धरून विजयाच समिकरण उत्तमरित्या सोडवले होते. यंदा पंजाब किंग संघाकडे पाहिल्यानंतर तसंच काहीसे जाणवते.

पंजाब किंग संघाकडेदेखील याआधी अनेक नामवंत आंतरराष्ट्रीय खेळाडू खेळायचे. मात्र त्या सर्वांची चांगली कामगिरी एकत्रितपणे कधीही होत नव्हती. या वेळेच्या पंजाब संघाची परिस्थिती वेगळी आहे. त्यांना श्रेयस अय्यर सारखा एक कल्पक धूर्त आणि उत्तम डावपेच लढवणारा कर्णधार मिळाला आहे. श्रेयस अय्यर आणि ऑस्ट्रेलियाचा माजी कप्तान रिकी पाँटिंग यांची जोडी याआधी दिल्ली कॅपिटल्समध्ये चांगली जमली होती. तीच जोडी यावेळी पंजाब किंग्ससाठी कार्यरत आहे. त्यामुळे या दोघांचे प्रशिक्षक आणि कप्तान म्हणून झालेल बॉण्डिंग आणि संघाची बिनचूक निवड, अगदी लिलावापासून संघात घेतलेले खेळाडू पाहिले, तर या दोघांनी संघाचा उत्तम ताळमेळ साधला आहे असेच वाटते.

त्यामुळे सर्वांना आश्चर्यचकित करणारी कामगिरी पंजाब किंग्सने यंदाच्या आयपीएलमध्ये सहा सामन्यांपर्यंत केली आहे. सहा पैकी त्यांनी पाच सामने जिंकले असून, एक सामना होऊ शकला नाही. म्हणजे पंजाब अजूनही अपराजित आहे. सीएसके, मुंबई इंडियन्स, केकेआर यांच्यासारखे मातब्बर संघ पहिल्यावहिल्या विजयासाठी 'स्ट्रगल' करीत असताना, पंजाब संघ मात्र यंदा चॅम्पियन सारखा खेळत आहे. अर्थातच याच श्रेय कप्तान श्रेयस अय्यर आणि प्रशिक्षक रिकी पाँटिंग यांना जाते. संघातील समतोल उत्तमरित्या साधला गेल्यामुळे हे त्यांना यंदा शक्य झाला आहे



पंजाब किंग्सच्या या यशाची आणखी काही प्रमुख कारणे म्हणजे, त्यांची आक्रमक फलंदाजी आणि मजबूत सलाम िची जोडी. सलामीवीर प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंह यांनी संघाला सातत्याने चांगली सुरुवात करून दिली आहे. त्यांच्या फलंदाजीत 'डेप्थ' असल्यामुळे ते केवळ एक किंवा दोन खेळाडूंवर अवलंबून नाहीत. कूपर कोनोली सारख्या नव्या खेळाडूनेदेखील मधल्या फळीत येऊन महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.

मर्यादित षटकांच्या किंवा अगदी छोटेखानी क्रिकेट स्पर्धेत, अष्टपैलू खेळाडू हे नेहमीच निर्णायक ठरत असतात. जेव्हा संघ फलंदाजीत कोसळतो तेव्हा हे खेळाडू बॅटिंगला आधार देतात. जेव्हा गोलंदाजीची गरज असते त्यावेळी, उपयुक्त गोलंदाजी करून कप्तानाला आणि संघाला मदतीचा हात देतात. या संघाकडे मार्कस स्टॉयनिस, मार्को यानसेन, अझमतुल्ला ओमरझाई आणि कूपर कोनोलीसारखे दर्जेदार अष्टपैलू खेळाडू आहेत, जे फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्हीमध्ये आपले योगदान देऊ शकतात.

पंजाबकडे जशी स्फोटक फलंदाजांची सलामीची जोडी आहे तशीच भेदक, वेगवान गोलंदाजीची जोडीही आहे. अर्शदीप सिंह आणि मार्को यानसेन वेगवान गोलंदाजीची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. युझवेंद्र चहलची अनुभवी फिरकी गोलंदाजी मधल्या षटकांमध्ये बळी मिळवून देण्यात यशस्वी ठरत आहे. नेतृत्व आणि मार्गदर्शन याबाबतीतही पंजाब संघ नशीबवान आहे.श्रेयस अय्यरच्या शांत आणि प्रभावी नेतृत्वाखाली संघ अधिक स्थिर झाला आहे, असे वाटते.

सकारात्मक सांघिक वातावरण यामुळे संघातील खेळाडू एकमेकांकडून शिकत असून, ड्रेसिंग रूममध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. फायदा मैदानावरील कामगिरीत दिसून येत आहे. त्यामुळेच यंदाच्या आयपीएलमध्ये पंजाबचा संघ आगळावेगळा आणि इतरांच्या तुलनेत सेटल किंवा स्थिरस्थावर झालेला संघ वाटतो. म्हणूनच कदाचित यंदाच्या आयपीएलचे विजेतेपद, पंजाबकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# मुंबईचा विजयी 'तिलक'

- अश्वनी कुमारची भेदक गोलंदाजी
- गुजरातचा विजयी रथ रोखला





**| अहमदाबाद | वृत्तसंस्था |**

नरेंद्र मोदी स्टेडियमवर मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्समध्ये सामना रंगला. या सामन्याचे नाणेफेक गुजरातने जिंकून प्रथम बॉलिंगचा निर्णय घेतला. यानंतर मुंबईने प्रथम फलंदाजी करताना १९९ धावा केल्या आणि मुंबईला २०० धावांचे लक्ष्य दिले. याउलट गुजरातची कामगिरी विशेष राहिली नाही. गुजरातला फक्त १०० धावा करता आल्या आणि सामना मुंबईने ९९ धावांनी जिंकला.

सलग चार सामने गमावल्यानंतर, पाच वेळच्या चॅम्पियन मुंबई इंडियन्सने अखेर विजयाचा सूर गवसला आहे. आयपीएल २०२६ चा पहिला सामना जिंकल्यानंतर, सलग दोन पराभवांचा सामना करणाऱ्या मुंबईने एकतर्फी सामन्यात गुजरात टायटन्सला ९९ धावांनी पराभूत केले. तिलक वर्माच्या पहिल्या आयपीएल शतकाने मुंबईला १९९ धावांपर्यंत पोहोचवले, तर सलग सहा सामन्यांपासून विकेट न घेतलेल्या जसप्रीत बुमराहनेही गोलंदाजीत पहिली विकेट घेऊन संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर, या हंगामातील आपला पहिला सामना खेळणाऱ्या वेगवान गोलंदाज अश्वनी कुमारने चार विकेट्स घेऊन मुंबईचा विजय निश्चित केला.

अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या आयपीएल २०२६ च्या ३०व्या सामन्यात, गुजरात टायटन्सला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले.

जेव्हा सामना सुरू झाला, तेव्हा याची कोणीही अपेक्षा केली नसेल. विशेषतः कागिसो रबाडाने आपल्या वेगवान गोलंदाजीने पॉवरप्लेमध्ये मुंबईसाठी केवळ ४४ धावांत तीन विकेट्स घेतल्या. पण मग नमन धीरने एक शानदार खेळी करून संघाला नियंत्रणात आणले आणि धावसंख्या शंभर धावांच्या जवळ नेली.

यानंतर संपूर्ण डाव तिलक वर्माच्या नावावर राहिला. मागील ५ सामन्यांमध्ये केवळ ४३ धावा करणाऱ्या तिलकने या सामन्यात अवघ्या ४५ चेंडूंमध्ये शानदार शतक झळकावले. एके वेळी तिलक २२ चेंडूंमध्ये केवळ १९ धावांवर खेळत होता, पण येथून पुढे तो अचानक स्फोटक बनला आणि अचूक गोलंदाजी करणाऱ्या जीटीच्या गोलंदाजांना झोडपून काढले. डावाच्या शेवटच्या चेंडूवर चौकार मारून तिलकने आयपीएलमधील आपले पहिले शतक पूर्ण केले. या सामन्यात गुजरात टायटन्सकडून वॉशिंग्टन सुंदरने २६ सर्वाधिक धावा केल्या. शुभमन गिलने १४, शाहरुख खानने १७ आणि कागिसो रबाडाने १२ धावा केल्या. कर्णधार हार्दिक पांड्या नाणेफेक हरला आणि त्याला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित करण्यात आले. मुंबईची सुरुवात अत्यंत निराशाजनक झाली, त्यांनी ५० धावांतच तीन गडी गमावले. फलंदाजीचा वेगही लक्षणीयरीत्या मंदावला होता. डावाच्या १७ व्या षटकापर्यंत मुंबईची धावसंख्या केवळ १४१ होती. गुजरातच्या भेदक गोलंदाजीसमोर मुंबई केवळ १६० किंवा १७० धावाच करू शकेल असे वाटत होते, पण शेवटच्या तीन षटकांत जे घडले त्याने बाजी पलटवली.

### असा पलटला सामना

मुंबई इंडियन्सच्या गोलंदाजांनाही या गोष्टीचा फायदा झाला. विशेषतः अश्वनी कुमारने कहर केला. अश्विनीने मुंबईसाठी ४ षटकांत २४ धावा देऊन ४ बळी टिपले. मिचेल सँटनर आणि अल्लाह गझनफर यांनीही प्रत्येकी २ बळी घेतले, तर जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांनी नव्या चेंडूने प्रत्येकी १ बळी घेत गुजरातला गारद केलं. अशाप्रकारे, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरताचा संघ १५.५ षटकांत अवघ्या १०० धावांवर ऑलआऊट झाला आणि मुंबईलने ९९ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

### १८ चेंडूंत ५८ धावा

गुजरातविरुद्ध मुंबईच्या संघाची संथ फलंदाजी पाहिल्यावर, ते १९९ धावांपर्यंत पोहोचतील अशी कोणालाच अपेक्षा नव्हती. मात्र, शेवटच्या १८ चेंडूंमध्ये तिलक वर्माने (४५ चेंडूंत १०१ धावा) ५८ धावा जोडून आपल्या संघाची पडती बाजू सावरलली. आणि हाच क्षण मुंबईसाठी सामन्यातील निर्णायक क्षण, अगदी टर्निंग पॉईंट ठरला म्हणा ना.. कारण २०० धावा करण्याचा मानसिक दबाव गुजरातच्या फलंदाजांवर वाढत गेला. त्यानुळे, पटापट, वेगाने धावा करण्याच्या प्रयत्नात गुजरातची आघाडीची फलंदाजी पूर्णपणे कोसळली.

# भारतीय पुरुष हॉकी संघ आगामी आंतरराष्ट्रीय मोसमासाठी सज्ज

**नवी दिल्ली :** भारतीय पुरुष हॉकी संघ आगामी आंतरराष्ट्रीय मोसमासाठी सज्ज होत आहे. एफआयएच प्रो लीग, विश्वकरंडक व आशियाई क्रीडा स्पर्धा या तीन महत्त्वाच्या स्पर्धा डोळ्यांसमोर ठेवून भारतीय हॉकी संघाने बंगळूरमध्ये सरावाला प्राधान्य दिले आहे.

बंगळूरमध्ये २० एप्रिलपासून सुरुवात झालेल्या राष्ट्रीय शिबिराचा शेवट ९ मे रोजी होणार आहे. या शिबिरासाठी ३६ हॉकीपटूंची निवडही करण्यात आली आहे. पुरुष हॉकी संघाच्या शिबिरामध्ये विशिष्ट बाबींवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात



### युवा खेळाडूंना संधी

**भारतीय संघाच्या शिबिरामध्ये यंदा युवा खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे. मोहीत शशीकुमार, प्रिन्सदीप सिंग या युवा खेळाडूंना गोलरक्षक म्हणून संधी देण्यात आली आहे. बचावफळीतही पुवन्ना चंदुरा बॉबी, यशदीप सिवाच, नीलम सेस, अमनदीप लाक्रा या युवकांची निवड करण्यात आली आहे. मधल्या फळीत राजिंदर सिंग, मनमीत सिंग, एम. रबीचंद्र सिंग, विष्णूकांत सिंग, राजकुमार पाल, नीलकांता शर्मा व रोशन कुजुर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.**

# प्रशिक्षक नवल सिंह बडतर्फ

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

भालाफेकपटू नीरज चोप्रा आणि पॅरालिम्पिक सुवर्णपदक विजेता सुमित अंतिल यांच्या तक्रारीनंतर द्रोणाचार्य पुरस्कार विजेते प्रशिक्षक नवल सिंह यांना भारतीय पॅरालिम्पिक समितीने बडतर्फ केले आहे. त्यांच्यावर मानसिक छळ, शिवीगाळ आणि दारू पिऊन अपमानास्पद वागणूक दिल्याचा आरोप करण्यात आला होता. तपासात प्राथमिक पुरावे मिळाल्यानंतर तातडीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला असून, खेळाडूंच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे.सुमित अंतिलने लेखी तक्रार दिल्यानंतर हे प्रकरण उघडकीस आले.

## सिद्धेश्वर बुद्रुक कबड्डी स्पर्धा
# आसनेवाडी अंतिम विजयी

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

श्री बापूजी क्रीडा मंडळ सिद्धेश्वर बुद्रुक येथे आदिवासी कातकरी समाज असोसिएशनच्या मान्यतेने कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत तालुक्यातील नामवंत संघांनी आपला प्रवेश निश्चित केला होता. स्पर्धेतील अंतिम लढत आसनेवाडी विरुद्ध दांडवाडी या दोन संघात झाली.आसनेवाडी संघातील खेळाडूने बहारदार खेळ करत अंतिम विजयी ठरला. या संघास रोख रक्कम ५ हजार व आकर्षक चषक तर द्वितीय क्रमांक दांडवाडी या संघास रोख रक्कम ३ हजार व आकर्षक चषक, तृतीय क्रमांक चिवे आणि चतुर्थ क्रमांक तळई



या दोन्ही संघास प्रत्येकी २ हजार व आकर्षक चषक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई शुभम वाघमारे, उत्कृष्ट पकड राहुल पवार, पब्लिक हिरो पिंटू या खेळाडूंना आकर्षक चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

# खाशाबा जाधव यांना मरणोत्तर पद्मविभूषण मिळणार

मुंबई : भारताला वैयक्तिक प्रकारात पहिले पदक मिळवून देणारे महाराष्ट्राचे महान कुस्तीपटू खाशाबा जाधव यांना मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार देण्याबाबत येत्या ४ मेपर्यंत निर्णय घेण्याच्या सूचना मुंबई उच्च न्यायालयाकडून केंद्राला देण्यात आल्या आहेत.

उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर खंडपीठाचे न्यायाधीश माधव जामदार व प्रवीण पाटील यांच्याकडून १५ एप्रिलला देण्यात आलेल्या आदेशामध्ये सांगण्यात आले होते की, महाराष्ट्राचे खाशाबा जाधव हे भारत देशाचे पहिले वैयक्तिक ऑलिंपिक पदकविजेते खेळाडू आहेत. यामध्ये कोणतेही दुमत नाही.

कुस्तीवीर खाशाबा जाधव फाउंडेशनने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर न्यायालयात सुनावणी सुरू आहे. या जनहित याचिकेत, खाशाबा जाधव यांना दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार पद्मविभूषण मरणोत्तर प्रदान करण्यासंदर्भातील त्यांच्या निवेदनावर गृह मंत्रालयाच्या निर्देशांची मागणी करण्यात आली होती. उच्च न्यायालयाकडून पुढे स्पष्ट करण्यात आले की, केंद्र सरकारने ४ मे रोजी किंवा त्यापूर्वी योग्य तो निर्णय घ्यावा. राज्य सरकारने आवश्यक असल्यास कोणत्याही अटींची पूर्तता तातडीने करावी, असे निर्देश उच्च न्यायालयाने देत पुढील सुनावणी ५ मे रोजी ठेवली आहे.

# चॅम्पियन चषकाचा मानकरी भवानी नडगाव

**| मुंबई | प्रतिनिधी |**

चॅम्पियन चषक २०२६ चे दोन दिवसीय क्रिकेट स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. या चॅम्पियन चषकाचा विजेतेपद भवानी नडगाव क्रिकेट अ संघानी पटकावले तर मालिकावीर किताबाचा मानकरी विवेक किजबिले ठरला.

अंतिम सामन्यात भवानी नडगाव अ संघाने दमदार खेळ करत विजेतेपद पटकावले तर सोमजाई क्रिकेट क्लब भेलोशी (अ) उपविजेतेपद मिळवले,श्री. कांळबादेवी क्रिकेट संघ खैरे संघाने तृतीय क्रमांक आणि हनुमान स्पोर्ट्स क्लब सोनघर संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. या स्पर्धेचा उत्कृष्ट फलंदाजाचा किताब अक्षय अबगुल पटकावला तर उत्कृष्ट गोलंदाज



संकेत यादव ठरला, मालिकावीर विवेक किजबिले यांनी वैयक्तिक किताब पटकवला.

या दोन दिवसीय क्रिकेट सर्वच स्पर्धा विशेष रंगल्याने प्रेषकांनी क्रिकेटचा मनमुराद आनंद लुटला. यादरम्यान मॅन ऑफ द मॅच बॅटिंग, बॉलिंग किंवा फिल्डिंगमध्ये सर्वोत्तम कामगिरी केली आहे, अशा खेळाडूंना टी-शर्ट देण्यात आले,. तसेच सहभागी संघाना सन्मानचिन्ह देण्यात आले. ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी असोसिएशनच्या कार्यकारी समितीमध्ये अध्यक्ष ज्ञानेश्वर भुवड, अमोल पवळेकर, संदिप चोरगे, विशाल देवळे, अजित देवळे, किशोर नाकते, महादेव तांबे, संतोष पोळेकर, दिगंबर धाडवे, अमित मालप, विकास भुवड, संकेत यादव, रोशन बैकर, विश्वास नामोळे, संकेत होडबे, वैभव मोरे, साहिल कोबनाक, प्रवीण पौळेकर, विनायक खेरटकर, जतीन मालुसरे यांच्यासह खेळाडू सदस्य संघानी मेहनत घेतली.

असोसिएशनच्या अधीपत्याखाली ५१ संघ नोंदनीकृत असून यांच्या नेतृत्वाखाली वर्षभरात २५ स्पर्धा खेळवण्यात आल्या होत्या, यामध्ये चॅम्पियन चषक मानाचा चषक मानला जातो.यावेळी विजेता संघाला आकर्षक चषक रोख रक्कम, व्यक्तीगत किताब पटकवणाऱ्या खेळाडूना घरी वापरण्यात येणाऱ्या वन मिक्सर, इस्त्री देण्यात आले. प्रतिवर्षी नव्या संघाला चॅम्पियन चषकाचा मानकरी बनता आल्याचे दिसून येत आयोजकच्या वतीने सांगण्यात आले.

## एमसीए क्रिकेट स्पर्धा
# रायगडच्या स्वराज गोवारीने झळकावले द्विशतक

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या सोळा वर्षाखालील मुलांच्या आंतरजिल्हा दोनदिवसीय निवड चाचणी क्रिकेट स्पर्धेत रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाचा सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज स्वराज गोवारी यांनी दमदार फलंदाजीचे प्रदर्शन करत पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या विरुद्ध खेळताना द्विशतक झळकावले आहे.



पुणे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघाने प्रथम फलंदाजीकरताना २८.२षटकांमध्ये अवघ्या ५४ धावसंखेवर संपूर्ण संघ गारद झाला. रायगडचा जलद गती गोलंदाज तनिष्क जातूषकरण यांनी ५ फलंदाजांना बाद केले तर विराज पाटील यांनी ४ गडी टिपले. रायगडच्या संघाने पहिल्या डावात दमदार सुरवात करत सलामीवीर तंत्रशुद्ध फलंदाज स्वराज गोवारी यांनी चौफेर फटकेबाजी करत नाबाद २०३ धावा काढत द्विशतक झळकावले. त्याला भव्यम यांनी ५८ व आशीर्व पाटील यांनी नाबाद ६४ धावा काढून साथ दिली. काल रायगडच्या संघाने ३३७ धावसंख्येवर एक गडी बाद असताना डाव घोषित केला असून रायगडच्या संघाने पहिल्या डावात २८३ धावांची भक्कम आघाडी घेतली आहे.

आज खेळाचा दुसरा व शेवटचा दिवस असल्याने रायगडचा संघ सामना आऊट राईट जिंकतो का यावर सर्वांचे लक्ष लागले आहे. याआधी रायगडच्या संघाने विलास स्पोर्ट्स अकॅडमी पुणे व स्टार्स क्रिकेट क्लब पुणे संघांवर विजय मिळवला आहे.

## आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये रचला इतिहास | १०० आंतरराष्ट्रीय टी-२० खेळणारी तरुण खेळाडू

# शेफालीचा विक्रमी शतकी धमाका

**| डरबन | वृत्तसंस्था |**

भारतीय महिला क्रिकेट संघाची स्फोटक फलंदाज शेफाली वर्माने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये एक नवा इतिहास रचला आहे. अवघ्या १५ व्या वर्षी पदार्पण करणाऱ्या शेफालीने आता वयाच्या २२ व्या वर्षी १०० आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळणारी सर्वात तरुण भारतीय खेळाडू होण्याचा मान मिळवला आहे. आपल्या आक्रमक फलंदाजीने प्रतिस्पर्धी गोलंदाजांच्या मनात धडकी भरवणारी शेफाली आता भारतीय क्रिकेटचा खऱ्या अर्थाने भविष्यकाळ म्हणून उदयाला आली आहे.

रविवारी (१९ एप्रिल) दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात मैदानात उतरताच शेफालीने हा भीम पराक्रम केला. वयाची २२ वर्षे आणि ८१ दिवस पूर्ण असताना तिने हा टप्पा गाठला आहे. यासह तिने आपली सहकारी खेळाडू जेमिमा रॉड्रिग्स हिचा विक्रम मोडीत काढला आहे. जेमिमाच्या नावावर २०२४ च्या महिला आशिया चषकादरम्यान



२३ वर्षे आणि ३२७ दिवस वय असताना १०० टी-२० सामने खेळण्याचा विक्रम होता. जागतिक स्तरावर विचार केला तर, १०० सामने खेळणारी शेफाली ही जगातील तिसरी सर्वात तरुण खेळाडू ठरली आहे. तिच्यापुढे केवळ रवांडाच्या गिसेले इशिमवे आणि हेन्रिएट इशिमवे यांची नावे आहेत. भारताकडून १०० आंतरराष्ट्रीय टी-२० सामने खेळणाऱ्या महिला खेळाडूंच्या विशेष क्लबमध्ये आता शेफालीचे नाव सुवर्ण अक्षरात कोरले गेले आहे.

याआधी कर्णधार हरमनप्रीत कौर, स्मृती मंधाना, दीप्ती शर्मा आणि जेमिमा रॉड्रिग्स यांनी हा पल्ला ओलांडला असून शेफाली आता या दिग्गज खेळाडूंच्या रांगेत जाऊन बसली आहे.

हरियाणाच्या रोहतकची कन्या असलेल्या शेफालीने २०१९ मध्ये अवघ्या १५ वर्षे २३९ दिवस वय असताना आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पाऊल ठेवले होते. सुरुवातीपासूनच आपल्या निडर आणि आक्रमक शैलीमुळे तिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २०१९ च्या महिला टी-२० चॅलेंजमध्ये मिताली राजच्या नेतृत्वाखालील व्हेलॉसिटी संघाकडून खेळताना तिने दिग्गज गोलंदाजांची पिसं काढली होती. तेव्हापासून शेफालीने मागे वळून पाहिले नाही.

### कसोटीतही शेफालीचा दबदबा

शेफालीची बॅट केवळ टी-२० मध्येच तळपते असे नाही, तर तिने कसोटी क्रिकेटमध्येही आपली ताकद दाखवून दिली आहे. २०२४ मध्ये चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम स्टेडियमवर दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना तिने शानदार शतक झळकावले होते. हे महिला कसोटी इतिहासातील त्यावेळचे सर्वात वेगवान शतक ठरले होते.मोठ्या सामन्यांमध्ये स्वतःला सिद्ध करण्याची शेफालीची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. गेल्या वर्षी भारताच्या महिला विश्वचषक विजयात तिची भूमिका महत्त्वाची होती. विशेषतः दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या अंतिम सामन्यात तिने ८७ धावांची खेळी करून आणि महत्त्वपूर्ण बळी घेऊन संघाच्या जेतेपदावर शिक्कामोर्तब केले होते. प्रत्येक फॉरमॅटमध्ये स्वतःला सातत्याने सिद्ध करणारी शेफाली वर्मा भारतीय क्रिकेटमधील एक नवा अध्याय लिहीत आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)